MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तेरावे / अंक २ / फेब्रुवारी २०१२

## संपादकीय

## विज्ञान समाजभिमुख हवे

२८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून पाळण्यात येतो. १९८७ पासून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून पाळला जाण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, १९३० साली भारताचे थोर गणिततज्ज्ञ सी. व्ही. रामन यांना याच दिवशी नोबेल पुरस्कार मिळाला आणि विज्ञानाच्या जागतिक नकाशावर भारताचे नाव कोरले गेले. प्राचीन भारतीय विज्ञान व वैज्ञानिक यांचे जगाला असलेले योगदान काळाच्या ओघात पुसट झाले पण विज्ञान दृष्टीची परंपरा लोपली नाही. त्यावरील राख झटकली जायला हवी.

स्वातंत्र्योत्तर भारतात भारतीय विज्ञानाचे शिल्पकार म्हणवल्या जाणाऱ्या भारताच्या पहिल्या पंतप्रधानांनी, म्हणजेच पंडित नेहरू यांनी 'भारताचे भवितव्य विज्ञानाचे असणार आहे' असे भाकित आपल्या लेखनात केले होते व त्याबरोबरच विज्ञानापासून दूर राहणे परवडणार नाही, असेही सांगितले होते.

विज्ञान दिन आणि विज्ञानाला भारताचे योगदान यांची आजची प्रतिमा मात्र धूसर आहे. भारताच्या विज्ञानाची प्रगती नीट अभ्यासली तर केवळ आकडेवारींची नोंद केली जाताना दिसत आहे. अमूक कोटी आंतरजाल जोडण्या, अमूक कोटी कि. मी. रस्ते, अमूक कोटी भ्रमणध्वनी ही सर्व आकडेवारी पाहुन भारत विज्ञानात पुढे गेला, असे म्हणणे म्हणजे स्वत:ची फजिती करुन घेणे आहे. आकडेवारीला एक मर्यादित महत्त्व असते व त्या मर्यादेतच आकडेवारी लक्षात घेतली जायला हवी.

खरा प्रश्न आहे तो भारत आज स्वातंत्र्यवीर सावरकर, पं. नेहरू व त्या काळातील अनेक विचारवंतानी म्हटले होते त्या दृष्टीने विज्ञाननिष्ठ बनला आहे काय? भारतात डॉ. रघुनाथ माशेलकर, जयंत नारळीकर इ. अनेक शास्त्रज्ञ आजही मूलभूत चिंतन करणारे आहेत. परंतु शिक्षणाची संख्यात्मक वाढ लक्षात घेतली, त्यांतील विज्ञानाच्या शिक्षणाचा दर्जा लक्षात घेतला, तर सर्वसामान्य माणसापासून विज्ञान कितीतरी दूर आहे असेच दिसते.

(मलपृष्ठ २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

श्रद्धा व अंधश्रद्धा यातील रेषा अतिशय पुसट असल्याने असे होत आहे का? आजही भारताचा मोठा भाग अंधश्रद्धा भ्रष्टाचाराने प्रेरित जीवन जगणारा पोथिनिष्ठच आहे. मूलभूत विज्ञानापासून आजचा तरुण दूरच आहे. तरुणांमध्ये विज्ञाननिष्ठा निर्माण व्हावी ती जोपासली जावी यासाठी केंद्रशासन 'इन्सपायर' सारखी योजना राबवत आहे. संख्यात्मक वाढीबरोबर इलर्निंग, डिजिटल लर्निंग हळू हळू शिक्षणात रुळत आहे हा वेग जगाच्या तुलनेत खूपच कमी आहे; कारण अमंलबजावणी करण्याचा वेग कमी आहे. शासनाची सगळी धोरणे गरिबांपर्यंत पोहोचतच नाहीत. त्यामुळे 'अशिक्षित' 'दारिद्रय रेषेखालील लोक', या संकल्पना अजूनही अस्तित्वात आहेत.

धर्म आणि विज्ञान यांचा संबंध जवळचा आहे. बट्रांड रसेल यांनी या विषयावर लिहिलेले पुस्तक अंतर्मुख करायला लावणारे आहे. त्याशिवाय अनेक विचारवंतांनी या संदर्भात केलेले चिंतन मूलभूत आहे. तरीही धर्मनिष्ठा व विज्ञाननिष्ठा अजूनही जनमानसात स्पष्ट नाही. आमचे कोणतेही धार्मिक स्थळ पहा. विज्ञानाला सुशिक्षितांना, त्यांच्या बुद्धिनिष्ठेला पटणार नाही असे जीवन चालू आहे. आपल्याला धर्मावरची तथाकथित 'देव' या संकल्पनेवरची श्रद्धा गमवायची असेल तर, एखाद्या धर्मस्थळाला मुद्दाम भेट द्या. अर्थात, याचा अर्थ भारतीय माणूस अवैज्ञानिक आहे असा सरसकट होत नाही. भारताच्या अंतराळ मोहिमांच्या क्षेत्रातील प्रगती मान्य करावी लागेल. पण चंद्रावरचे पाणी शोधताना आजही कित्येक कि.मी. चालत जाऊन कळशीभर पाणी आणणाऱ्या ग्रामीण स्त्रिया दिसतात. ही विरंगती अस्वस्थ करते. कशाचेही फक्त राजकारण करावयाची सवय लागलेल्या आम्हांला शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्त्या कशा थांबवायच्या ते कळत नाही.

राजकीय क्षेत्रांतील लोकांनी माजवलेली बजबजपुरी विलक्षण वेदनादायक आहे. त्यांनी देशाचे केलेले वाटोळे सुधारणारे विज्ञान आज आम्ही विकसित करू शकलो नाही.

यासाठी निर्मितीक्षम, विज्ञाननिष्ठ तरुणांना विज्ञान क्षेत्रात यावेसे वाटेल, असे वातावरण तयार करण्याची गरज आहे. या तरुणांना संधी दिल्या जाणे हेही महत्त्वाची आहे.

इतर अनेक देशांची वैज्ञानिक धोरणे पाहिली तर डिजिटल लर्निंगच्या आजच्या काळात वैज्ञानिक विकासात असंख्य दिशा आहेत हे जाणवेल. या दिशांच्या क्षितिजावर सूर्य उगवले तर भारताला विज्ञानातील गतवैभवाचे दिवस मिळतील. या तरुणांना विज्ञाननिष्ठ बनवणाऱ्या शिक्षणाने त्या दृष्टीने कंबर कसायला हवी. तर विज्ञान समाजभिमुख होईल.

**मोहन पाठक, ठाणे**

●●●






**वर्ष तेरावे / अंक २ / फेब्रुवारी २०१२**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ८ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अंदमानची अविस्मरणीय सहल | - डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | भारतीय संस्कृती- बीज, मॉडेल व साधना | - श्री. यशवंत साने | ९ |
| ३) | मला भेटलेला एक विक्षिप्त टी. सी. | - श्री. मा. ना. पाटील | १६ |
| ४) | स्वामी रामतीर्थ (लेखांक दुसरा) | - श्री. शं. बा. मठ | १८ |
| ५) | 'दिशा' सूची- २०११ | - श्री. सचिन गराटे | २२ |
| ६) | परिसर वार्ता | - संकलित | २७ |
| ७) | पुन्हा भ्रष्टाचार | - डॉ. विजय बेडेकर | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# अंदमानची अविस्मरणीय सहल

*सावरकरांना दहा वर्षे ज्या तुरुंगात ठेवले होते ते भारतातील अंदमानमध्ये वसलेले दर्शनीय पवित्र स्थळ. त्या अंदमानच्या अनोख्या प्रवास वर्णनासंबंधातील हा लेख – संपादक*

स्वातंत्र्यवीर सावरकर हे एक स्फूर्ती देणारे व्यक्तिमत्त्व. १९०६ ला ते इंग्लंडला शिकायला गेले. शिक्षणाबरोबरच स्वातंत्र्यज्योत तेवत ठेवण्याचा त्यांनी पण केला होता. आपल्या परीने लोकांना स्वातंत्र्याची जाण करूण देणे, स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणे अशी कामे ते करीत असत. त्यामुळे बॅरिस्टरीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतरदेखील इंग्रज विचारवंतांनी त्यांना बार ॲट लॉ ला बोलाविले नाही. उलट, इंग्रजांविरूद्ध कपट कारस्थाने करता असा आरोप ठेवून त्यांना अटक केली. त्यांच्यावरील खटला इंग्लंड ऐवजी भारतात चालविला जावा या हेतूने त्यांना जुलै१९०९ मध्ये बोटीने आणले जात होते. ही बोट जेव्हा फ्रान्सच्या मार्सेलिस धक्क्याला लागली तेव्हा सावरकरांनी बोटीतून शिताफीने आपली सुटका करून घेतली आणि पोहत फ्रान्सच्या किनाऱ्याला लागले. त्यांचे हे परीश्रम मात्र वाया गेले. कारण फ्रान्सच्या सैनिकांनी त्यांना पकडून इंग्रज अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले. असे जरी असले तरी त्यांचे हे कार्य अतिशय धाडसाचे होते. त्या धाडसी कृत्याला १०० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अनेक कार्यक्रम करण्यात आले. युरोपातील महाराष्ट्र मंडळाचे काही सभासद तसेच भारतातील काहीजण मार्सेलिसला जाऊन आले. काही संस्थांनी वेगवेगळे कार्यक्रम आखून तो दिवस साजरा केला. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी मात्र अगदीच नवीन शक्कल लढविली. सावरकरांच्या समुद्रातील उडीच्या शतकाच्या निमित्ताने त्यांनी सावरकरांच्या जीवनावर निबंधस्पर्धा जाहीर केली. निबंधाचे बक्षीसही तसेच नवलाचे होते. उत्तम निबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना अंदमानची सहल घडविण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. या स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांतून चार विद्यार्थ्यांची सहलीसाठी निवड करण्यात आली. त्यांच्याबरोबर आणखी चार जण स्वखर्चाने सामील झाले. असा आठ जणांचा चमू अंदमानला घेऊन जाण्याची मला संधी मिळाली. या सहलीबद्दल थोडक्यात माहिती या लेखात दिलेली आहे.

अंदमान आणि निकोबार बेटे ही तसे पाहिले तर आपल्याच देशाचे अविभाज्य भाग आहेत. परंतु या बेटांबद्दल फारशी माहिती सर्वसामान्य भारतीय माणसाला नसते. याचे एक कारण म्हणजे या बेटाचे भारत भूमीपासूनचे अंतर. अंदमान बेटावरील पोर्ट ब्लेअर या शहराचे कलकत्त्यापासून अंतर सुमारे १५०० किलोमीटर तर चेन्नई पासून अंतर सुमारे १३०० किलोमीटर आहे. तेथे पोहोचण्याचे दोनच मार्ग आहेत: एकतर जलमार्ग नाहीतर हवाई मार्ग. जलमार्गाने जायचे तर तीन दिवस प्रवास करावा लागतो. हवाई मार्गाने देखील २ तासांहून अधिक काळ लागतो. कलकत्ता आणि चेन्नई ही दोनच भारतीय शहरे पोर्ट ब्लेअरशी जोडलेली आहेत. या बेटावर लोकवस्ती विरळ आहे. दैनंदिन संपर्कही कमीच. त्यामुळे तेथील घटनांचा आपल्या प्रसारमाध्यमात उल्लेखदेखील होत नाही. मागे त्सुनामी आली तेव्हा या बेटांवर मोठा हाहाकार माजला. त्यावेळेस प्रसारमाध्यमांनी या बेटाची दखल घेतली. त्यानंतर जैसे थे! अंदमान निकोबार हा सुमारे ११० बेटांचा समूह आहे. त्यांच्या वतीने एक सभासद प्रत्येक निवडणुकीत लोकसभेसाठी पाठविला जातो. त्याची स्वतंत्र विधानसभा नाही. केंद्र सरकार नायब राज्यपालांची नेमणूक करते. त्याच्या देखरेखीखाली या सर्व बेटांचा कारभार

चाललेला असतो. अशा या बेटावर जायचे म्हटल्यावर मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे प्रश्नार्थक चेहऱ्यानेच आम्ही प्रवासाला सुरुवात केली.

२२ नोव्हेंबरला विमानाने मध्यरात्रीच्या सुमारास आम्ही चन्नईला पोहोचलो. चेन्नई ते पोर्टब्लअर विमान दुसऱ्या दिवशी सकाळी जायचे होते. त्यामुळे आख्खी रात्र आम्हाला चेन्नईच्या विमानतळावर काढावी लागली. परंतु गप्पांच्या ओघात रात्र कशी सरली ते कळलेच नाही. सकाळ होताच एअर इंडियाच्या विमानाने आकाशात झेप घेतली. थोड्याच वेळात जमीन संपून सर्वत्र महासागराचे साम्राज्य जाणवू लागले. पोर्ट ब्लेअरला पोहचेपर्यंत निळ्याशार पाण्याखेरीज दुसरे काहीच दिसत नव्हते. विमानतळ जवळ येताच मात्र खाली बघणाऱ्यांच्या डोळ्यांचे पारणेच फिटले. विमानाच्या खिडकीजवळ ज्यांना जागा मिळाली त्यांनाच हे पाहता आले. त्यामुळे इतर मंडळी त्यांचा हेवा करू लागली. विमान जसे खाली उतरू लागते तसे निळ्या समुद्रात पसरलेले रम्य असे हिरवे बेट आपल्या नजरेस पडते. जमीन आणि पाणी यांच्यातली कड आपले लक्ष वेधून घेते. अशा या भारावलेल्या अवस्थेत आम्ही विमानाच्या बाहेर आलो. विमानतळ छोटेच आहे. तथापि त्याला स्वातंत्र्यवीर सावरकर आंतरराष्ट्रीय विमानतळ असे यथोचित नाव दिलेले आहे. आपले सामान मिळाल्यानंतर लगेच आम्ही हॉटेलकडे प्रस्थान केले.



**पोर्ट ब्लेअर शहरातील एक चौक**

सेल्युलर जेल हे अंदमान बेटावरील एक प्रेक्षणीय स्थळ. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटिश राजवटींनी या जेलची निर्मिती केली. अट्टल गुन्हेगार आणि स्वातंत्र्य सैनिक यांना भारताच्या भूमीपासून दूर ठेवण्यासाठी ती योजना होती. तिथे गेलेले फारच थोडे कैदी जिवंत परत आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या कारागृहाचे राष्ट्रीय स्मारकात रूपांतर केलेले आहे. अंदमानला येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाने या स्मारकाला भेट द्यावी असेच हे ठिकाण आहे. आम्ही देखील सर्वप्रथम सेल्युलर जेल पाहायचे ठरविले. पोर्ट ब्लेअर शहराच्या एका टोकाला समुद्र किनारी हे कारागृह बांधलेले आहे. बैलगाडीच्या चाकाचे आरे जसे असतात तशी या कारागृहाची रचना केलेली आहे. मध्यभागी दंडगोलाकृती उभी इमारत असून तिच्या सभोवती सात आरे निर्माण केलेले आहेत. या प्रत्येक विभागात लहान लहान खोल्या बांधलेल्या आहेत. या खोल्यांनाच ते सेल म्हणत. यावरूनच कारागृहाला सेल्युलर जेल असे नाव पडले. प्रत्येक सेलला लोखंडी दरवाजा असून वरच्या बाजूला हवा येण्यासाठी छोटीशी खिडकी आहे. सेलमध्ये फारसा उजेड येणार नाही याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक सेल म्हणजे एक अंधारकोठडीच वाटते. सातही भागांची रचना अशी केलेली आहे की एका कोठडीतील व्यक्तीला दुसऱ्या कोठडीतील व्यक्तीचे दर्शन होणार नाही. प्रत्येक विभाग तीन मजली आहे. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जायचे असेल तरी केंद्रीय इमारतीजवळ जावे लागते. तेथेच फक्त जीना आहे. एवढेच नव्हे तर, केंद्रीय इमारत आणि हे विभाग लाकडी फळ्यांनी जोडलेले आहेत. जर कोणी केंद्रीय इमारतीकडे चालत आलाच तर त्याच्या पावलांचा आवाज होईल यासाठी ही व्यवस्था केलेली आहे. त्याचबरोबर, गरज पडल्यास हा लाकडी भाग काढून टाकता येतो. त्यामुळे सातही विभागांतील कैदी कुठेही जाऊ शकणार नाहीत. एकंदरीत, बराच विचार करून या जेलची निर्मिती केलेली आहे.


दुर्दैवाने जेलचे सात भाग आपल्याला आता पाहता येत नाहीत. कारण दुसऱ्या महायुद्धात त्याची पडझड झालेली आहे.

प्रवेशाचे तिकीट घेऊन आम्ही आत प्रवेश करताच एका मार्गदर्शकाने (गाईडने) आमचे स्वागत केले. त्याच्या कडून आम्हाला या कारागृहासंबंधी खूपच महत्त्वाची माहिती मिळाली. कारागृहाच्या बाहेर असलेल्या दुमजली इमारतीत मोठे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात सेल्युलर जेलमध्ये शिक्षा भोगलेल्या स्वातंत्र्यवीरांचे फोटो आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने बंगाली आणि शीख स्वातंत्र्यावीरांचा भरणा अधिक आहे. त्या सगळ्यांमध्ये उठून दिसणारी दोन चित्र आहेत. ती म्हणजे स्वातंत्र्यासाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या दोन महाराष्ट्रीयन बांधवांची: बाळाराव सावरकर आणि विनायक सावरकर. हे दोघेही याच कारागृहात होते. परंतु एकमेकांना त्याचा अनेक वर्षे थांगपत्तादेखील लागला नाही. एवढी जबरदस्त सुरक्षा यंत्रणा ब्रिटीश अधिकाऱ्यांनी तेथे राबविली होती.




**बाळाराव सावरकरांची कविता**

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी सुभाषचंद्र बोसांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली आणि जपानी सैनिकांच्या मदतीने त्यांनी भारताचा काही भाग स्वतंत्र केला. त्यातला पहिला भाग म्हणजे अंदमान हे बेट होय. याच बेटावर सुभाषचंद्रांनी भारतीय स्वातंत्र्याचा पहिला झेंडा रोवला. ते जर जिवंत राहिले असते आणि युद्धात जपानचा विजय झाला असता तर आजचे भारताचे चित्र वेगळेच राहिले असते. परंतु नियतीला ते मान्य नव्हते. एका विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. १९४५ ला अमेरिकेने टाकलेल्या दोन अणुबॉम्बमुळे जपानने शरणागती पत्करली. असे जरी असले तरी त्यानंतर आणि आधी काही काळ जपानी सैन्य या परिसरात राहिले. त्यांनी आपल्या संरक्षणासाठी खंदक खोदले होते. असे खंदक आपल्याला अनेक ठिकाणी आजही पहायला मिळतात. सेल्युलर जेलचादेखील त्यांनी ताबा घेतला होता. युद्ध कैद्यांना आणि गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी येथे ठेवले जायचे. काही का असेना स्वातंत्र्याच्या प्रयत्नात त्यांनी सुभाषचंद्राना मदत केली. म्हणून आपण जपान्यांचे आभार मानले पाहिजेत. सुभाषबाबूंच्या कार्याचे महत्त्व जाणून त्यांच्यासाठी एक वेगळे प्रदर्शनीय दालन येथे निर्माण केलेले आहे. ते पाहण्याची संधी आम्हाला मिळाली.




**सुभाष बाबूंचा देशबांधवांना सल्ला**

प्रदर्शनाच्या इमारतीतून आपण जेव्हा पटांगणात येतो तेव्हा एक पेटती ज्योत आपले लक्ष वेधून घेते. स्वातंत्र्यवीरांची स्मृती जागृत ठेवण्यासाठी इंडियन ऑईल कंपनीने ह्या ज्योतीची निर्मिती केली असून ती सतत तेवत ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. त्याच्या पाठीमागे

दिसते त्या १७५८ च्या स्वातंत्र्य संग्रामात आहुती देण्याऱ्या सैनिकांचे हुतात्मा स्मारक.





**पेटती ज्योत आणि हुतात्मा स्मारक**

सरळ पुढे पहावे तर नजरेस पडते एक वडाचे जुने झाड आणि त्याच्या जवळच बसण्यासाठी टाकून ठेवलेल्या लोखंडी खुर्च्या. दररोज संध्याकाळी येथे वीज आणि ध्वनी (Light and Sound Show) कार्यक्रम होतो. त्यावेळेस हे वडाचे झाड आपल्या स्मृतीतून येथे काय काय घडले हे सांगते. आपल्याला हा शो संध्याकाळी पहायचा आहे असे सांगून आमच्या मार्गदर्शकाने आम्हांला पुढे नेले. सर्वप्रथम त्यांनी आम्हाला दाखविला तो भटारखाना, जेथे कैद्यांसाठी रोज अन्न शिजविले जायचे. त्यानंतर त्यांनी आम्हांला दाखविले ती फाशी द्यायची जागा. दोरीने गळफास लावून त्यावेळेस फाशी दिले जायचे. फाशी देण्यापूर्वी प्रत्येकाला त्याची शेवटची इच्छा विचारली जायची. प्रत्येकजणच धर्माच्या चालीरीतीप्रमाणे अंत्य संस्कार करण्याची इच्छा व्यक्त करीत असे. प्रत्येकाची इच्छा मानली जाईलच याची शाश्वती नव्हती. फाशी देऊन झाल्यावर मृतदेहाला तळघरात ठेवले जाई. त्यानंतर सोयीनुसार अंत्यसंस्कार केले जात किंवा मृतदेह समुद्रात फेकला जाई. तळघरातील ती कोठडी बघताना आमच्या अंगावर शहारेच आले. तसे पाहता शहारे येण्यासारखी अनेक ठिकाणे तिथे आहेत. जेलमधील कैद्याला बैलासारखे तेलघाण्याला जुंपले जाई. त्याचे एक मूर्तिमंत चित्रण तेथे केलेले आहे. त्याचबरोबर जुना तेलघाणा देखील तेथे ठेवलेला आहे.





**जेलमधील भटारखाना आणि फाशी घर**

स्वातंत्र्यवीर सावरकर याच जेलमध्ये राहात होते. त्यांना १९११ मध्ये येथे आणण्यात आले होते. एकानंतर एक अशा दोन जन्मठेपेच्या शिक्षा त्यांना भोगायच्या होत्या. २५ वर्षाची एक जन्मठेप या हिशेबाने ते १९६१ साली जेलमधून बाहेर पडले असते. प्रत्यक्षात मात्र त्यांना १९२१ मध्ये काही अटींवर सोडण्यात आले. १९११ ते १९२१ या १० वर्षाचा काळ त्यांनी येथल्या कोठडीत काढला होता. ती कोठडी पाहायची आम्हांला उत्सुकता लागली

होती. आमची उत्सुकता जास्त न ताणता आमच्या मार्गदर्शकाने फाशीच्या ठिकाणापासूनच सावरकरांची कोठडी आम्हांला दाखविली. तिसऱ्या मजल्यावरची उजव्या बाजूकडची शेवटची खोली होती ती. आम्ही लगेच त्या खोलीजवळ गेलो. इतर सगळ्या कोठड्यांना एकच लोखंडी दार होते. सावरकरांच्या खोलीला मात्र दोन लोखंडी दारे होती. कारण ब्रिटिशांच्या दृष्टीने ते अतिशय खतरनाक असे कैदी होते. आपल्या कोठडीत सावरकरांनी भिंतीवर कविता लिहिल्या होत्या. त्या आता रंगकामात पुसल्या गेलेल्या आहेत. असे जरी असले तरी त्यांच्या नावाची पाटी या कोठडीत लावलेली आहे. त्यांच्या खोलीच्या दारात येऊन खाली पाहिले की फासावर लटकणाऱ्या व्यक्ती त्यांना दिसत असत. त्यांना दहशत बसावी यासाठीच ही व्यवस्था करण्यात आली होती, असे मार्गदर्शकाने आम्हाला सांगितले.



**सावरकरांना दुसऱ्या मजल्यावरील शेवटच्या खोलीत ठेवलेले होते**

सावरकरांच्या कोठडीचे दर्शन घेऊन आम्ही केंद्रीय इमारतीत आलो. तेथे सर्व स्वातंत्र्यवीरांची नावे लिहिलेली आहेत. तसेच कोणकोणत्या महत्त्वाच्या व्यक्तींनी या स्मारकाला भेट दिली त्याची माहितीदेखील दिलेली आहे. तेथे वर जाण्याची सोय आहे. जिन्याने वर गेले की आजूबाजूचा रम्य परिसर दिसतो. विस्तीर्ण समुद्रात वसलेले अंदमान हे छोटेखानी बेट असल्याचे तेथेच आपल्या लक्षात येते. आम्ही आजूबाजूला नजर टाकतो तोच अंधार पडू लागला होता. आता दृकश्राव्य कार्यक्रम सुरू होईल असे आम्हांला सांगण्यात आले. म्हणून आम्ही मैदानात ठेवलेल्या खुर्च्यांवर स्थानापन्न झालो. सेल्युलर जेलच्या निर्मितीपासूनची माहितीच कार्यक्रमात सांगितली जाते. ज्या भागाविषयी माहिती असेल तेथला दिवा पेटतो. त्यामुळे आपले लक्ष तिकडे वेधले जाते. हा कार्यक्रम खूपच चांगला केलेला आहे. तो पुन्हा पुन्हा बघावासा वाटतो.





**कोठडीतील एक सत्य सांगणारा फलक आणि सावरकरांचा फोटो**

सहलीच्या तिसऱ्या दिवशी आम्ही हॅवलॉक बेटावर जायचे ठरविले होते. ह्यासाठी बोटीने जावे लागते. आमच्या सर्वांची बोटीची तिकीटे आधीच काढून ठेवलेली होती. सकाळी ५.३० वाजता आम्ही हॉटेल सोडले आणि धक्क्यावर पोहोचलो. ७.३० ला अचूक वेळेवर आमची बोट निघाली. सर्वत्र पाणीच पाणी. मधूनमधून छोटी छोटी बेटे दिसायची एवढेच. हॅवलॉक बेटावर पोहचायला आम्हांला अडीच तास लागले. मध्ये थोडावेळ लाटा उसळत होत्या. परंतु बाकीचा प्रवास सुखाचा झाला.

हॅवलॉक हे छोटेखानी बेट असून पर्यटकांसाठीच त्याचा विकास करण्यात आलेला आहे. मनसोक्त भटकंती करायला, स्कूबा डायविंग करायची आणि समुद्रातील कोरल बघायला लोक येथे येतात. आम्ही मात्र मनसोक्तपणे समुद्रकिनारी बीचवर वेळ घालविला व ठरलेल्या वेळी पुन्हा धक्क्यावर पोहोचलो. तेथे आल्यावर कळले की आमची बोट पोहोचल्यानंतर वादळ सुरू झाले. त्यामुळे अनेक बोटी रद्द कराव्या लागल्या. आमच्या परतीच्या प्रवासाला त्यामुळे उशीर झाला. त्यापेक्षा आम्ही सुखरूप पोहोचलो याचाच आम्हांला आनंद होता. दिवस अगदी मजेत गेला. मोठ्या बोटीतून समुद्रप्रवास करायचा आनंद लुटता आला आणि मुख्य म्हणजे स्वच्छ, सुंदर असे समुद्रातील बेट प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता आले. आम्ही किती फोटो घेतले असतील याची मोजदाद नाही. हॉटेलला परत आल्यावर आपापले अनुभव सांगण्यातच मध्यरात्र उलटून गेली.






**हॅवलॉक बेटावरील स्वागत कक्ष**

सहलीचा चौथा दिवस आमच्या परतीच्या प्रवासाचा होता. आम्ही सर्वांनी आपापल्या बॅगा भरल्या. प्रत्येकाने काहीतरी खरेदी केलीच होती. तरीही नवीन काही मिळते का हे बघण्याची उत्सुकता होतीच. तसे आम्ही मार्गदर्शकाला सांगितले. त्यांनी आम्हांला एका मोठ्या अशा हँडिक्राफ्टच्या दुकानात नेले. स्थानिक लोकांनी बनविलेल्या वस्तू तेथे विक्रीला ठेवलेल्या होत्या. प्रत्येकाने मनसोक्त खरेदी केली. आम्ही विमानतळाकडे कूच केले. प्रथम पोर्ट ब्लेअर ते चेन्नई प्रवास, चेन्नईच्या विमानतळावर थांबणे नंतर चेन्नई मुंबई प्रवास करून संध्याकाळी आम्ही मुंबईच्या विमानतळावर पोहोचलो. चार दिवस एकत्र होतो. तेवढ्यात आपुलकी निर्माण झाली होती. एकमेकाला निरोप देताना डोळे पाणावले. परंतु घरच्यांना सहलीचा अनुभव सांगण्याची ओढ असल्याने प्रत्येकाने आपापल्या घराचा रस्ता धरला. अशी झाली आमची अंदमानची अविस्मरणीय सहल. कुणाला जायचे असेल तर सांगा, पुन्हा अशी सहल आयोजित करायला आम्हांला नक्कीच आवडेल.




**भारत खरोखरच 'इन्क्रेडीबल' आहे**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# भारतीय संस्कृती - बीज मॉडेल व साधना

*बीज, मॉडेल व साधना या प्रदीर्घ लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक :**


या अंकात व नंतरही आपण 'संस्कार क्रियेत' किंवा 'संवाद क्रियेत' किंवा 'ज्ञान वा शब्द (आध्यात्मिक अर्थ) ह्या संक्रमण क्रियेत कसा व्यवहार होतो ते पहाणार आहोत.

**संवाद भिन्न पातळीवर :**

प्रथमच, हे सांगितले पाहिजे कीं, भारतीय वैदिक ज्ञानात'ह्या बहुरंगी, बहुव्यापी संक्रमण क्रियेचे, पुरे वा संपूर्ण ज्ञान आहे. आपल्याला त्याचा पूर्ण परिचय नाही. जागरण आवश्यक आहे !! त्या विशिष्ट ज्ञानाची 'शास्त्रे' पण समृद्ध व सज्ज आहेत.

पण, आपण एका 'अज्ञानी मर्त्य' भौतिक पातळीवर' आहोत व ह्या क्रियांची 'वैश्विक स्वरुपे' आपल्याला अज्ञात आहेत.

व्यक्ती - व्यक्ती किंवा व्यक्ती - समाज ह्यामध्ये संवाद सतत घडत असतो. त्यांच्या 'भौतिक ज्ञान पातळीवर प्रथम, आपण विचार करू या.




"I am ok you are ok" ह्या नांवाचे एक अमेरिकन पुस्तक अत्यंत लोकप्रिय आहे. लेखकाचे नांव



Mr. Thomas A. Harris, MD हे आहे.

त्याच्या पुस्तकातील सिद्धातांचा, मुख्य मुद्दा हा आहे, की संवादाच्या तीन वैयक्तिक पातळ्या किंवा स्तर असतात.

**" Transactional Analysis" (T.A.) हे त्या सिद्धांताचे नांव "T.A. posits that there are three modes that the self can be in and operate from 'child' 'Parent' and Adult'.**

**शिशु, पालक आणि 'ज्येष्ठ व्यक्ती' किंवा प्रौढ माणूस अशी ती तीन नांवे पण ह्यांचा वयाशी संबंध नाही.** तर वृत्ती, ज्ञानाशी पातळी, नात्याची, प्रेमाची, आदराची वगैरे भूमिका इथे जास्त महत्त्वाची आहेत.

हे पुस्तक मुळातच वाचावयाला हवे. पुस्तक व सिद्धांत जुना आहे. आपल्याला तो भारतीय आध्यात्मिक व 'आगम ज्ञानी' (व्यक्ती) व सामान्य जनता यांच्या संवाद क्रियेला संबोधित करावयाचा आहे.

**संवाद क्रियेला अडथळे :**

मग, मला या पुस्तकाची का आठवण झाली? सध्या

संवादाच्या मुक्त प्रवाहाला मोठे अडथळे निर्माण झाले आहेत! ह्याचे मुख्य कारण म्हणजे 'भौतिकवादी, पाश्चात्य, विज्ञानवादी, निरीश्वरवादी, सेक्यूलर, धार्मिक, सांप्रदायिक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, प्रोफेशनल वगैरे, वगैरे जे अनेक भेद आहेत, त्या व्यक्तींशी संवाद करताना त्यांच्या ('Paradigmal Knowledge') बंदिस्त ज्ञान चौकटीचाच अडथळा येतो व संवाद विसंवादी होऊ लागतो! त्यांचा 'एका छोट्या विकसित शास्त्राच्या ज्ञानाच्या बंदिस्त ज्ञानाचा, त्यांना बहुतेक वेळा प्रगट, स्तुत्य, सूक्ष्म अहंकार असतो.

त्यामुळे 'आध्यात्मिक ज्ञानी माणसाला, त्यांच्याशी संवाद करताना वा बोलताना, नेहमी जाणवते की, त्यांनी आपल्या येणाऱ्या नवीन आध्यात्मिक ज्ञानाची, अनुभूतीची कवाडे, खिडक्या, दारे पूर्ण बंद केली आहेत. हा पूर्वग्रह, अश्रद्धा, अनिच्छा, आळस वा भौतिक पगडा असू शकतो. आणि, मग संवाद होतच नाही.

जसा, दोन बहिऱ्या मंडळीत किंवा एखाद्या ज्ञानी माणसाचा आंधळ्या व बहिऱ्या माणसाशी ज्ञानासंबंधी एकतर्फी प्रवाह होतो आहे व तो 'पालथ्या घड्यावर पाणी' अशा धर्तीवर वाहून जातो आहे. "Dialogue of the Deff" 'बहिऱ्यांचा संवाद' असा प्रकार आहे.

**स्वत:च्या पातळीचे भान नाही :**

हे असे का होते? कारण, ते खरोखर बहिरे नाहीत ना! मग अडथळा का? भिन्न पातळी, पूर्वग्रह दूषित, अहंकार ही कारणे असतील का? 'शिशू' चा जेव्हा पालकांशी संवाद होतो, तेव्हा शिशू पातळीचा अर्थ, त्या जीवनस्तरावर जीवनाचा ज्ञानाचा कमी प्रत्यय हा गृहीत भाग धरला जातो ना? आणि 'पालकाचा स्तर जरा उंच पातळी मानला जातो ना? शिवाय, ह्या ज्ञानाचे संक्रमण 'शिशूवर त्याच्या फायदेशीर उद्देशानेच केले जाते ना?

पण, '**शिशूची**' आवड '**कॅडबरी चॉकलेट**' हीच असेल, तर पालकाने त्याला **कॅडबरीचे आरोग्यावर दुष्परिणाम होतात**, हे सांगणे किंवा **त्याला हे खाण्यापासून परावृत्त करणे हे शत्रूत्वाचे लक्षण मानवयाचे काय?** प्रश्न कॅडबरीचा नाही. पण 'अध्यात्म शास्त्रातल्या संकल्पना ह्या '**अव्यक्त जग**' व '**व्यक्त जग**' ह्यामधील नाते संबधावर अवलंबून आहेत. हे एखाद्या योगी वा आधुनिक 'ज्ञानेश्वराला' जर ज्ञान प्राप्त झाले, तर त्या ज्ञानाबद्दल संवाद करताना 'भौतिकवादी' माणसाने (वयाचा संबंध नाही) '**शिशूच्या** ऐकण्याच्या भूमिकेत' जावयाला हवे की नको?

त्याच्या उलट **आईनस्टाईन** हे जर वेद पठण शास्त्री, पुरोहित, भटजी, मठाधिपती, साधु, गुरु वगैरे मंडळी व इतर यांना अॅटम बॉम्बच्या प्रत्यक्ष निर्मितीबद्दल चर्चा वा ज्ञानदान करणार असतील तर, 'शास्त्रीबुवांनी सुद्धा शिशूच्या' भूमिकेत निदान काही तास जावयाला हवे की नको? पण , असे घडत नाही!! कारणे, उघड आहेत!!

ह्याच्या ही पुढे जाऊन, खुद्द वसिष्ठ, व्यास, वाल्मिकी, ज्ञानेश्वर व खुद्द प्रभू शिवशंकर ह्यांची 'कमिटी' जर वैश्विक सत्य,गहन अशा 'सनातन धर्माचे' विवरण व निरुपण करावयाला प्रगट झाले, तर ह्या आईनस्टाइन, शास्त्री किंवा इतर थोर व्यक्ती, ह्या सर्वांनी ह्या दैवी संपदा असलेल्या कमिटीला 'Adult' म्हणजे 'ज्येष्ठ, श्रेष्ठ ज्ञानी म्हणून मान देऊन ऐकण्याच्या मानसिक भूमिकेला जावयाला हवे की नको? पण, त्यांना ह्या आगम ज्ञानाचा सुप्त तिरस्कार असतो किंवा पूर्वग्रह व 'सत्य' त्यांना त्यांच्या चौकटीतच प्रत्ययाला हवे असते!! हा सांप्रदायिक अहंकार म्हणावयाला हवा.

कदाचित, ह्या ज्ञानाची आम्हांला' काही आवश्यकता वाटत नाही असे त्यांना वाटत असावे. तरीपण वडील मंडळींना 'पालक' ह्या नात्याने (Parents) आदराची भूमिका देऊन 'ऐकण्याचा प्रयत्न', Listening

mode' (Act of True Listening) करण्याच्या भूमिकेत जाणे योग्य नव्हे कां? त्यांत त्यांचे व समाजाचे हित असण्यचा संभव त्यांनी मानावयाला काय हरकत आहे? त्यामुळे, आजच्या 'ज्ञानाच्या वा अज्ञानाच्या पातळीलाच संवाद स्पर्श शकतो. हा सध्याचा प्रभाव आहे!!

**सत्यज्ञान स्वीकारावयाला हवे ना ।।**

ह्या जगात आता संवाद पूर्णपणे थांबण्याची लक्षणे उघडपणे दिसूं लागली आहेत. निदान, भारतात तरी!!

भारतीय पार्लमेंटमध्ये वारवांर '**प्रत्येक प्रश्न चर्चेने सुटेल**' असे घोषले जाते. पण, प्रत्यक्षात **लाउडस्पीकर फेकणे. थोबाडीत मारणे, चप्पल वा बूट फेकणे हे 'नवीन आदर्श' प्रस्थापित होऊ लागले आहेत व त्याचे जलद गतीने 'ग्लोबल झेशन' होऊ लागले आहे.**

**भगवद् गीतेतील संवादाच्या पातळ्या**

**कोणत्या आहेत ह्या 'व्यक्तीगत पातळ्या? भगवान उवाच, धृतराष्ट्र, संजय, अर्जुन 'उवाच' ह्या संबोधलेल्या त्या पातळ्या** होत !! महाभारतात **धनुर्धर अर्जून** व **सुदर्शन चक्रधारी कृष्ण** ह्यांचा संवाद 'भगवद् गीता' ह्या नांवाने प्रसिद्ध आहे.

ह्या संवादाची **'दृश्य पातळी'** जरी 'पृथ्वीवरील भारतदेशातील '**कुरुक्षेत्र**' असली, तरी ती '**क्षेत्र**' ह्या नावाने जाणली जाते. '**क्षेत्र**' ह्याचा अर्थ, ''वैश्विक रचनेतील भौतिक व जड सृष्टितील चैतन्याची ज्ञानाची पातळी वा भूमी असा मी करू इच्छितो. त्याच्यापुढे भगवान कृष्ण तर अर्जुनाच्याच पुढे किंवा बरोबर प्रत्यक्ष रथावर 'सारथ्याच्या' भूमिकेत स्थानबद्ध होता. मग, त्याची ज्ञानाची पातळी बरोबरची किंवा अर्जुनापेक्षा कनिष्ठ होती?


**त्याची पातळी 'धर्मश्रेत्र'** ही होती

**कुठली कोणती ही भूमी? कोणते हे क्षेत्र ही पातळी?**

ही भारताच्या भूभागावरची पंजाब, हरियानामधली होती का? बिलकूल नव्हे!!

धर्म म्हणजे अर्थात 'सनातन धर्म' होय. ह्याचाच अर्थ ह्या वैश्विक निर्मितीचे सर्व ज्ञान व व्यवहार जाणणारे ज्ञान ज्या पातळीवर आहे ते स्थान म्हणजे 'धर्मक्षेत्र'. ह्या उच्च पातळीवर भगवान कृष्ण व भौतिक ज्ञानाच्या पातळीवर अर्जून, असे जाणावयाला हवे ना!!

**महायोगी अरविंद**



**महायोगी अरविंद काय म्हणतात ते पाहू या.**

"The Gita is not a weapon for dialectical warfare: it is a gate opening on the whole world of 'Spiritual Truth' and experience and the view it gives us embraces all the provinces of that supreme region. It maps out, but it does not cut up or build walls or hedges to confine our vision?

स्वैर भाषांतर

''भगवदगीता हे काही दोन पक्षातील युद्धाचे शास्त्र नव्हे! ते तर आध्यात्मिक विश्वाचा खजिना उघडणारा दरवाजा होय. आणि गीता जे दर्शन आपल्याला दान करते ते तर त्या दिव्य सृष्टीच्या संर्वागाचा व दालनांचा आलिंगनार्थ व दर्शनार्थ अनुभव देऊन जाते. गीता, त्याचा संपूर्ण नकाशा दर्शविते. पण, कोठेही कापकापी किंवा भिंती व अडसर किंवा अडथळे, काटेरी कुंपणे उभी करून आपल्या दृष्टीला संकुचित करत नाही.''

**आंधळे ज्ञान व जीवन हेतू**

धृतराष्ट्र उवाच (कुठची पातळी??) धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।

भ.गीता – अध्याय?– ।।१ ।।

**ह्याचा गूढार्थ कोणता? (Version) Aurotindo :- Dhritarastra said - on the field of Kurukhetra, the field of the working out of the Dharma gathered together. . .**

**कुरूक्षेत्रावर 'धर्माची (संस्कार) क्रिया करण्यासाठी जमलेल्या – युद्ध उत्सुक जीवांनी – काय केले?**

**"We might symbolically translate the phrase as the field of human action, which is the field of the evolving Dharma."**

**(स्वैर भाषांतर)**

**''आपण प्रतीकात्मक भाषांतर शास्त्राप्रमाणे 'मानवी कृतींचे क्षेत्र (युद्ध), हे धर्माच्या उत्क्रांतीचे क्षेत्र असे समजून चालू शकतो.''**

**ह्याचाच अर्थ ह्या भौतिक युद्धाच्या क्षेत्रावर कुरुक्षेत्रावर घडणाऱ्या 'महाभारत युद्धाचा' अर्थ लाक्षणिक वा प्रतीकात्मक अर्थाने खरोखरी 'धर्माच्या उत्क्रांतीचे' क्षेत्र स्थळ असा करू शकतो.**

**TASC - Transactional Analysis Spiritual Science**

ह्या दृष्टि क्रमात अर्जुन हा 'सुयोग्य विद्यार्थी' किंवा 'शिशू' व 'भगवान कृष्ण' हे त्याचे सारथी – मार्गदर्शक 'दिशा' वा मार्गचातक व ह्या उपदेशाचा व त्यावर आधारलेल्या युद्ध संघर्ष कर्माचा हेतू धर्माच्या उच्च धारणेच्या प्राप्तीचा असा करावा लागेल. मग सर्व गीता उपदेश व त्यातील अनेक संदर्भ शास्त्रांतील ज्ञान व शेवटी प्रत्यक्ष 'विश्वरूप दर्शन' ही सर्व ह्या संवादाची दालने होतात. अर्जुनालाही 'विश्वरूप दर्शन' (११ वा अध्याय) झेपले नाही. पण, त्याने त्या ज्ञानाचा अव्हेर किंवा निंदा केली नाही, उलट जन्मांतरी जाणण्याची इच्छा प्रगट केली.

ह्या संवादात 'अर्जुनाची ज्ञान उत्सुकता व अनुकूलता आवश्यक आहे. आणि त्या क्षणी त्याला त्याच्या 'विषाद' भ्रमातून, कुचंबणा झालेल्या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी 'मुक्त व अनिर्बंध संवादाची आवश्यता आहे. आगम अर्थ जाणण्याची इच्छा जागृत व्हावयाला हवी आहे!!

पण, असे संवाद आज घडत नाहीत. कारण मतभेदाच्या, अज्ञानाच्या, पूर्वग्रहाच्या, अनिच्छेच्या दगडी भिंती समाजात उभ्या राहिल्या आहेत, असे मनोमन वाटते. समाजानेही ह्या 'अंहकाराला' खतपाणी व प्रतिष्ठा दिली आहे!! एवढेच नाही तर ज्ञान देणाऱ्या गीतेचे गायन भोगवादी "Item songs", "Corruption Songs", ह्यांच्या "Physical violence, कर्कर्श नादाने बुडवून टाकले आहे. ह्या संवादाची का आवश्यकता आहे, ते आपण एक उदाहरण घेऊन तपासून पाहू या व त्यातील समाज परिवर्तन ज्या स्तरावर होण्याची अपेक्षा आहे त्यातील अडचणींचे स्वरूप जाणून घेऊ या.


यासाठी मी **''एकात्म मानव दर्शन – चिरंतन हिंदू जीवनदुष्टी – एक अध्ययन''** ह्या पुस्तकाची निवड करतो आहे. (ह्याचा आधार (दैशिकशास्त्र – श्री. १०८ सोंबारी महाराज हा आहे.)



**सोंबारी महाराज**

त्यांतील मलपृष्ठावर खालील मजकूर छापला आहे






तो पुस्तकाचे थोडक्यात उद्देश व संकल्पना कथन करतो.

''प्रत्येक राष्ट्रीय समाजाच्या अंतरंगात अंगभूततेनेच एक विकास क्षम **आंतरिक उर्जा** असते व तिला एक **निश्चित दिशा** लाभलेली असते. **ही आंतरिक उर्जा नियोजित दिशेने गतिमान होणे म्हणजे** त्या राष्ट्रीय **समाजाचा विराट जागृत होणे.**

त्यादृष्टीने **हिंदू समाजाच्या संदर्भात**

**''आत्मनो मोक्षार्थ जगद्हिताय च''** हे व्यक्तीचे जीवित साफल्य, **'कृण्वंतो विश्वमार्यम'** हा **सामाजिक संकल्प** व **'सर्वेऽपि सुखितः सन्तु'।** ही विश्वकल्याणाची मंगल कामना अशा **ध्येयव्रताच्या संस्कारातून** ही **राष्ट्रीय इच्छाशक्ती जागृत आणि** सक्रिय करणे म्हणजेच **'विराट' जागा करणे.''**

आता 'विराट' ही संकल्पना कोणती? ह्याकरिता मी श्री. १०८ सांबारी महाराजांच्या 'दैशिक शास्त्र' ह्या निरुपणाचा आधार घेतो.

''**चिती** से जागृत और एकीभूत (Integral) हुई समष्टि की प्राकृतिक क्षत्रशक्ति अर्थात अनिष्टोंसे रक्षा करनेवाली शक्ति **'विराट'** कही जाती है।

त्याचे निरुपण प्रा. प्रा. कृ. साबळापूरकर असे करतात. **''चितीने जागृत आणि एकभूत झालेल्या समष्टिची प्राकृतिक क्षात्रशक्ति** - अर्थात **अनिष्टापासून रक्षण करणारी जी शक्ती - तिलाच विराट म्हणतात.** (पान - १६)


''हे विराट तत्त्व व्यक्तीच्या हृदयात असलेल्या चितीनेच जागृत होते. चितीच नाहीशी झाली तर विराटही नाहीसा होतो.'' (पान १६)

**आता प्रश्न आला 'चिती' म्हणजे काय?**

**''सृष्टिच्या आरंभी प्रत्येक अमैथूनिक जनसमुदायाची** जी विशेष प्रकारची **मानसिक प्रवृति** असते व **दानधर्मानुसार** जी **मैथुनिक संततीस** प्रप्त होते त्यास **'चिती'** म्हणतात. (पान - १५ दै.ध.)

आता ह्या 'चिती' संकल्पनेचे महत्त्व काय?

इंदुमती काटदरे ह्या आपल्या 'The hindu concept of Development'




ह्या लेखात म्हणतात -

Chiti is a very unique concept in 'Hindu thought and cannot easily and correctly translated into English.

**So chiti is the root.** Every **Rastra**, which can Loosely be translated as **the 'Nation' has its own 'chiti'**. chiti is the soul of the Rastra. Chiti is the swablava of the Jati (जाति).

So the chain is formed like this, chiti swabhava view point mindset thought patterns Behaviour patterns Arrangements, System and para phernalia"

The title given to the chain from 'chiti to Vyavastha (i.e. System etc) of Bharat - is Hindu Concept. (P 126 - "Hindutra in present context)

श्री. सावळापूरकर सांगतातः-

''ही चितीच जातिरूप शरीराचे चैतन्य आहे. म्हणूनच आमच्या आचार्यांच्या सिद्धान्तानुसार 'एकचिती' व एक प्रकारचे प्राकृतिक निर्माण असणारा समुदाय 'जाति' या संज्ञेस प्राप्त होतो. (पा. १६ दै. शास्त्र)

आता 'जाति' ह्या शब्दाने ध्वनित होणारी दैशिक शास्त्राच्या विशेष परिभाषा (Jargon) मधील संकल्पना नीट जाणून घेऊ या.

''प्रत्येक जाति भगवती प्रकृतीच्या कोणत्या ना कोणत्या कार्य विशेषासाठीच उत्पन्न होते. ज्याचे कार्य संपते त्या जाति संपतात. क्वचित आवश्यकता पडली तर त्यातीलच शेष स्फुल्लिंगे पुनः सतेज होऊन उठतात.'' (पान १६)

मग दैशिक धर्माचा अर्थ काय? (धर्म = Law) चिती व विराट यांची धारणा ज्या कर्माने होते तोच यथार्थाने 'दैशिक धर्म' वा 'जाति धर्म होतो. **केवळ जडभूमीचे प्रेम** व त्या भूमीसंबधी हितेच्छा एव्हढेच पुरेसे नाही.

**जातीसाठी भोगविलासाची प्रगती करणे यास दैशिक धर्म वा जातिधर्म म्हणत नाहीत.** (पा. १८ - दै. शास्त्र)

आता 'देश' वा 'राष्ट्र' ह्या कोणत्या विशेष संकल्पना आहेत, ह्या 'दैशिक शास्त्राच्या' परिभाषेत?

''जी भूमि त्या ठिकाणी राहणाऱ्या 'आश्रित जातीचा' बोध करून देते त्यालाच देश म्हणतात. मग राष्ट्र म्हणजे काय? थोडक्यात - देश+जाति =राष्ट्र देश हे भौगोलिक स्थान व जाति हे त्यात रहाणारे मानव या दोहोंचे मिळून आजचे राष्ट्र होते.

**म्हणजे 'Nation' ह्या शद्बाने जे जाणले जाते ते राष्ट्र नव्हे तर!!**

पुन्हा एकदा आपल्या पुस्तकात वर्णन केलेल्या राष्ट्र कार्याची मार्गव्यक्ती व दिशा पाहू या !!

१) ''आत्मनो मोक्षार्थ जगद्हितायच''
२) ''कृण्वंतो विश्वमार्यम''
३) सर्वेऽपि सुखिनः सन्तु

मी हा संकल्पनांचा नकाशा मुद्दाम प्रयत्नपूर्वक पुन्हा एकत्र मांडला आहे. त्याचे कारण ह्या संकल्पना ज्या 'विश्वरचनेचा' गृहीत अर्थ धरून चालतात तो वेदिक विश्वनिर्मीती व त्यातील 'ऋग्वेदातील 'पुरुष' संकल्पने वर आधारलेला आहे. त्याची पूर्ण जाणीव अभावानेच दिसते.

पुरुषसूक्तामध्ये जी 'पुरुष' संकल्पना आहे त्यात देह+आत्मा ही युती 'सत्य स्थिती' तील मानवी रुपाचे दर्शन आहे. तसेच जन्म, पुनर्जन्म किंवा Vedic Eschatology व Vedic Cosmology ह्या दोन्ही संकल्पना Reality Status of the Universe and life in it" म्हणजे ह्या दृश्य अदृश्य किंवा व्यक्त किंवा अव्यक्त विश्वाच्या सत्य दर्शनाला व जन्म मृत्यू ह्या चक्राच्या व उन्नतीच्या संकल्पना गृहीत सत्य मानून चालणाऱ्या आहेत.

तेव्हा, त्यातील 'मोक्षाच्या', 'सुखाच्या', आत्म्याच्या-जीवात्म्याच्या, व्यष्टी, समष्टी, परमेष्टी, सृष्टी

ह्या संकल्पना ज्या वेदिक किंवा इतर 'दर्शने' ह्यावर आधारित आहेत– त्या पूर्णपणे स्पष्ट होणे जरूर आहे.

त्याचे Reality Status – वैश्विक अनंत काळचे सत्य, ह्या स्तरावरचे ज्ञान, अर्थ व जाणीव अत्यावश्यक आहे. वरवरचे, साहित्यिक गुळमूळीत अर्थ उपयोगाचे नाहीत!

एवढेच नव्हे तर त्यातील उद्धरेत आत्मनाऽत्मानं' ह्या भगवद्‌गीता वचनाच्या उपदेशात्मक प्रगती ही कशी होते हे जाणणे ही महत्त्वाचे आहे. त्यासाठी खरा आत्मबोध व आत्मज्ञान होणे आवश्यक आहे!

हे सर्व काही सध्याच्या 'सामाजिक, आर्थिक, राजकीय कार्याच्या ध्येय, धारणेतून प्राप्त होणार आहे असे धरून चालणार नाही. हे उघड व्हावे.

हा प्रयत्न ज्या आध्यात्मिक मार्गाने वा आधुनिक संकल्पनेत 'Spiritual Science' च्या तत्वज्ञानावर, साधनेवर, उपासनांवर, योगसाधनेने होणार आहे त्याची माहिती व त्यात प्रावीण्य मिळवणे अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे आहे.

सुरुवातीला जो वाद 'सुयोग्य संवाद क्रिये' वर मी लिहिला आहे, त्याचे कारण आता सांगावयाला हरकत नाही. ह्या संवाद प्रक्रियेत घडोघडी अडथळे येतात व ते कोणते व का येतात, ह्याचे विवेचन 'दिशाच्या' पुढील अंकात विचार करू या!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## स्पर्धेबद्दल

**विद्याप्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या सावरकरांवरील विशेष निबंध स्पर्धेसाठी एकूण ९४ निबंध आले होते. परीक्षणाच्या अंतिम फेरीत मा. डॉ. विजय बेडेकर, श्री. मा. य. गोखले व डॉ. सुधाकर आगरकर यांनी परीक्षकांनी निवडलेल्या २५ निबंधांतून ४ निबंध पारितोषिकासाठी निवडले. २९ ऑगस्ट २०११ रोजी या पाच स्पर्धकांच्या प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला.**

**अंदमान स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेले विद्यार्थी– निनाद पाटणकर (वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन) अंकुश राणे (जोशी बेडेकर महाविद्यालय), आदित्य जोशी (सरस्वती इंग्रजी माध्यम), गार्गी अष्टेकर (सरस्वती मराठी माध्यम) हे होते. या चौघांचा खर्च पारितोषिक म्हणून वि. प्र. मंडळाने केला. यांच्या समवेत डॉ. सुधाकर आगरकर, सौ. नेहा जोशी, श्रीमती अंजली पटवर्धन, श्री. प्रभाकर आणि कौशल रेडे हे गेले होते.**

**या निबंध स्पर्धेसाठी १) माझी जन्मठेप, २) सहा सोनेरी पाने, ३) सावरकरांचे विज्ञाननिष्ठ निबंध, ४) लंडनची बातमीपत्रे व ५) सावरकरांच्या कविता व नाटके हे विषय देण्यात आले होते. हे पाचही निबंध आम्ही लवकरच 'दिशा' मध्ये देत आहोत.**

**– संपादक**

## मला भेटलेला एक विक्षिप्त टी. सी.

*काही माणसाचा स्वभाव, त्या स्वभावाचे कांगरे हे कायम लक्षात राहतील असाच एक अनुभव – संपादक*

टी. सी. म्हणजे रेल्वे स्टेशनवरचा तिकीटे गोळा करणारा रेल्वेचा कर्मचारी. घडलेली कथा साधारणपणे १९५०-५१ सालातील. १९४८ ते १९५७ – ९ वर्षाचा सरकारी नोकरीचा काळ. त्यानंतर १९५७ ते १९६४ चा काळ मुंबईतील खाजगी नोकरीचा आणि १९६४ ते १९९० एकूण २६ वर्षाचा काळ ठाण्यातील खाजगी नोकरीचा.

सरकारी नोकरीचा पहिला टप्पा ठाणे – मुंबई रेल्वेने रोज पासावर प्रवास होत असे. टी. सी. ची कथा याच टप्प्यांत घडली. रोज ठाणा स्टेशनवरुन जाणे येणे होत असे. स्टेशनच्या मधल्या दरवाज्यावरचा टी. सी. त्यामुळे चेहरे पट्टीने चांगला ओळखीचा झाला होता. त्यामुळे बाहेर पडताना कधीच खिशातून पास काढून दाखविण्याची वेळच आली नव्हती. शनिवारी अर्धा दिवस नोकरी झाली की. दुपारची २-२० ची फास्ट ठाणा लोकल ने ठाण्याला आलो आणि बाहेर पडताना त्याच टी. सी. ने थांबवले. मी पास काढून दाखवला तरी तो मला जाऊ देईना. ''खडे रहो'' म्हणून मला बाजूला उभे केले. मला आश्चर्य वाटले की पास असताना मला कां आडवले? मला काहींच समजेना. लोकांची गर्दी संपली आणि त्याने मला त्याच्या बरोबर त्याच्या ऑफिसमध्ये चलण्यास सांगितले. ऑफिसमध्ये गेल्यानंतर तो काय करणार या विषयी माझे कुतुहल चालू होते. त्याने आतल्या बाजूस जाऊन ड्युटीचे कपडे बदलले आणि बाहेर आला. नंतर मला बरोबर घेऊन प्लॅट फॉर्मवर एक लोकल उभी होती तिच्यात आम्ही बसलो. तो काहींच सांगत नव्हता. फक्त आवांतर प्रश्न विचारीत होता.

दुपारी ४ पर्यंत आम्ही बोरीबंदरला आलो. तेथे त्यांच्या तिकीट ऑफिसमध्ये तो गेला. मला बाहेर थांबावयास सांगितले. थोड्या वेळानंतर तो बाहेर आला. बाहेरगावी जाणाऱ्या गाड्या असतात तिकडे आम्ही दोघे गेलो. तेथे पुण्याला ५.०० वा. सुटणारी डेक्कन क्वीन गाडी प्लॅटफॉर्मला उभी होती. तेथे मला अुभे करून तो पुन्हा कोठेतरी जाऊन आला. नंतर गाडी सुटण्यापूर्वी तो आला. आम्ही दोघे डेक्कन क्वीन ने रात्री ९.०० वा. पुण्यास पोहचलो.

पुण्याला स्टेशनवर टी. सी. साठी विश्रांती खोलीमध्ये झोपण्याची व्यवस्था करून आम्ही दोघे बाहेर पडलो. पुणे कँटाँनमेंट भागामध्ये एका प्रशस्त हॉटेलमध्ये गेलो. तेथे भोजन करून आम्ही पुणे स्टेशनवर झोपण्यासाठी परत आलो. सर्व खर्च त्यानेच केला. हे काय चालले आहे यांचा मला काहींच अुलगडा होईना. रात्रभर मस्त झोप काढून सकाळी मुंबईला जाणाऱ्या गाडीने मी ठाण्याला उतरलो व ते टी. सी. महाशय मुंबईला गेले. त्यानंतर काही दिवस टी. सी. ठाण्याला दिसत नव्हता चौकशी केली तेव्हा समजल की, टी. सी. ची बदली झाली आहे. त्यानंतर बरीच वर्षे अुलटून गेली, आणि खाजगी नोकरीचा टप्पा म्हणजे १९५७ ते १९६४ हाही पूर्ण झाला.

१९६४ जून पासून १९९० काळातील खाजगी नोकरीचा दुसरा टप्पा चालू होता. १९७२-७३ मध्ये माझ्या एका मित्राच्या लग्नानिमित्ताने बंगलोरला जाण्याचा योग आला. ४-५ दिवस बंगलोरमध्ये मुक्काम होता. लग्नाच्या दिवशी खूप मंडळी जमा झाली होती. त्यामध्ये एक व्यक्ती सारखी माझ्याकडे पाही आणि मीही त्या व्यक्तीकडे पहात

होतो. कोठेतरी जुनी ओळख असावी असे सारखे मनात घोळत होते. फक्त चेहरा ओळखीचा वाटत होता. नांव गाव काहींच लक्षात नव्हते. लग्न लागले जेवणे झाली. लग्नाच्या हॉलला लागून व्हरांडा होता. तेथे कांही मंडळीचे पान पट्टी, खाणे, धूम्रपान करणे चालले होते. मीही पान पट्टी खाल्ली आणि गंमत बघत बसलो होतो. तेथे ती व्यक्ती पुन्हा आली. माझ्या शेजारी बसली आणि बोलणे सुरु केले. थोडे इंग्रजीत थोडे हिंदीत बोलणे चालू होते. वेल, जंटलमन व्हेअर फ्रॉम यु आर कमिंग? मी उत्तर दिले ''फ्रॉम बॉम्बे - ठाणा'' ठाणा म्हटल्याबरोबर त्याने ठाण्याच्या स्टेशनवर मी टी. सी. म्हणून काही दिवस होतो. मी म्हटले यस, यस, आय थिंक वी हॅव मेंट देअर. तो म्हणाला सकाळी पाहिल्यापासून मी विचार करत होतो या माणसाला कुठेतरी पाहिले आहे. माझ्याही मनात तोच विचार घोळत होता. ओळख पटल्यावर त्याने सांगितले की सेंट्रल रेल्वेची नोकरी पक्की झाल्यानंतर मी पुणे - बँगलोर विभागाकडे म्हणजे साऊथ सेंट्रल विभागाकडे बदली करून घेतली आणि सध्या मी साऊथ सेट्रल विभागाकडे ट्रॅव्हलींग तिकेट इन्स्पेक्टर (T.T.I) म्हणून काम करीत आहे. बराच वेळ गप्पा गोष्टी झाल्यानंतर तो निघून गेला.

लग्न झाल्यानंतर २ दिवसांनी आम्ही सर्व ठाण्याला परत येणार होतो, मध्ये एक दिवस मोकळा मिळाल्याची संधी लाभली तीचा फायदा घेऊन मी आणि ठाण्यातील आणखी एक जोडीदार मिळून बंगलोर शहरांतील प्रेक्षणीय ठिकाणे हिंडून आलो. ठाण्यात १९५०-५१ मध्ये भेटलेला टी. सी. आणि त्यानंतर २२-२३ वर्षांनी बंगलोरला भेटलेला टी. टी. आय हे दोघे एकच व्यक्ती होती याची पूरेपूर खात्री झाली.

**- मा. ना. पाटील**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद
विद्या प्रसारक मंडळ

●●●

## आवाहन

**दिशाचे हितचिंतक, वाचक, लेखक या सर्वांना आम्ही लेखन सहकार्याचे आवाहन करत आहेत. माननीय पाटील साहेबांसारखे अनेक लहान मोठे प्रसंग आपणही जगत असतो. त्यातून व्यक्तीच्या स्वभावाचे वेगळे व कंगोरे पहायला मिळतात. असे अनुभव आमच्या पत्त्यावर आपण पाठवलेत तर आम्ही ते प्रकाशित करण्याचा नक्की प्रयत्न करू.**

**- संपादक**

मा. संपादक 'दिशा'

दिशाचे गेल्या दहा वर्षातील अंक माझ्या संग्रहात आहेत. आपले हे नियतकालिक उत्तम असून त्याचा वाचकवर्ग वाढावा असे मला वाटते.

अनेक हॉस्पिटलमधील प्रतीक्षाकक्ष, जनरल वॉर्ड येथ पर्यंत मासिक पोहोचले तर आधिक वाचले जाईल सूचनेचा आपण विचार कराल ही अपेक्षा.

- स्नेहांकित
**अशोक बेंद्रे**
कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

●●●

# स्वामी रामतीर्थ (लेखांक दुसरा)

महाविद्यालयीन शिक्षण

*स्वामी रामतीर्थ यांच्यावरील लेखमालेतील दुसरा लेख*

मॅट्रिक झाल्यावर तीर्थराम आपल्या वडीलाना भेटण्यासाठी मुरालीवाला येथे आला. वडिलानी सांगितले मॅट्रिक झाला आहेस कुठेही नोकरी कर व प्रपंचाचाभार हलका कर. तीर्थरामला वडिलांचे हे बोलणे आवडले नाही. तीर्थरामनी वडिलाना सांगितले अजून माझे शिक्षणाचे वय आहे म्हणून पुढील शिक्षण घ्यावेसे वाटते. वडिलाना या बोलण्याचा राग आला. त्यांनी तीर्थरामाला सांगितले शिक्षणासाठी मला पैसे देता येणार नाहीत. तुलाच सारी व्यवस्था करावी लागेल. तीर्थरामला बरे वाटले. कितीही कष्ट पडले तरी आपण पुढे शिकावयाचे असा निश्चय करून लाहोर येथील महाविद्यालयात जावयाचे ठरविले. आपला मनोदय वडिलाना सांगितला.

घरून तीर्थराम गुजराणवाला येथे आला. डॉ. रघुनाथ मळ यांना घडलेली हकीकत सांगितली. तीर्थरामनी पुढे शिकावे असे त्यानाही वाटले. त्याचप्रमाणे धन्नीराम यानाही वाटत होते. दोघानी अनुकूता दर्शविल्यामुळे तीर्थरामाचा उत्साह वाढला. आपण अत्यंत काटकसरीने राहावायाचे असे ठरवून सन १८८८ साली लाहोरला आला.

लाहोरला अत्यंत स्वस्तातील झोपडी वजा घर एक रुपया भाड्याने घेतले. आठ आण्याची पादत्राणे खरदिली. पाच आणे खर्च करून बाज विणून घेतली. दोन रुपयाचे कपडे केले. लाहोर येथील फोरमन ख्रिश्चन कॉलेज मध्ये दाखल झाला. त्यावेळी कॉलेज फी वर्षाची रु. ४५ होती. तीर्थरामाला हे पर्वता इतके मोठे वाटले. जेवण अगदी साधे घेत असे. भगतजीना लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे की खानावळ खर्च महिना रु. ४ आहे. मी घरीच जेवण बनवितो. मला रु. २ खर्च येतो. शिक्षणासाठी तीर्थराम किती काटकसरीने राहात होता याची कल्पना येईल.

भगवंतावर विश्वास ठेवून शिक्षणाला सुरुवात केली. त्याला एक अनुकूलता प्राप्त झाली. गुजराणवाला नगरपालिका आपल्या शहरातून मॅट्रिक मधे सर्वात जास्तगुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला दरमहा रु. ८ पारितोषिक वृत्ती देत असे. त्याचा लाभ त्याला झाला. एकदा त्याच्या घरात चोरी झाली. अंथरूण व कपडे चोरीला गेले. मात्र पुस्तके व दिवा याना चोराने हात लावला नव्हता. ईश्वराची माझ्यावर कृपा आहे असे पत्र त्यानी धन्नीरामला पाठविले.

त्याने दुसरीकडे झोपडी वजा घर रु. १ ।। भाड्याने घेतले. हे घर विद्यालयापासून दूर होते. इथे एकांतही नव्हता. तीर्थरामची प्रकृती वारंवार बिघडत असे पण तो काळजी करत नसे. सन १८९० साली इंटरची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला. फोरमन ख्रिश्चन कॉलेजमधे पहिला आला. संपूर्ण विद्यापीठात पंचवीसावा नंबर होता. या परीक्षेनंतर वडिलांनी पुनः नोकरी करण्याबद्दल आग्रह केला. तीर्थरामांनी शिक्षणाचा मनोदय स्पष्ट केला. वडील रागावले. घरी सुटी घालवण्यापेक्षा अभ्यासासाठी ताबडतोब घर सोडले. पुस्तकांची जुळवाजुळव केली. अभ्यासाला लागला. यामुळे त्याच्या डोळ्यांवर परिणाम झाला. त्याची दृष्टी अधू झाली. ही स्थिती प्रचार्यांना कळली. त्यानी मदतीचा हात पुढे केला. नेत्र विशारदाकडे पाठवून डोळे तपासून घेतले. अखेर चष्मा लावण्याचे ठरले. तीर्थरामाकडे पैसा नव्हता. प्राचार्यानी मुंबईहून चष्मा आणविला. त्याला

देत याचा नीट वापर करण्याबद्दल सांगितले. चष्मा मिळताच अभ्यासाला गती आली. खर्च भागण्यासाठी फावल्या वेळात शिकवण्या करू लागला. तथापि त्याची आर्थिक ओढाताण बरीच होत असे.

ही गोष्ट प्राचार्यांना कळली त्यानी कॉलेज वसतीगृहात राहण्याची व ग्रंथालयातील पुस्तके घेऊन वाचण्याची सोय केली. बी.ए.च्या प्रथम वर्षात त्याच्या गणिताचे प्रध्यापक आजारी पडले.त्यावेळी गणित शिकविण्याचे तीर्थरामानी काम केले. सर्व विद्यार्थी त्याच्या शिकवण्याच्या पद्धतीवर खूष होते. त्याला प्रतिष्ठा लाभली.

इतक्यात वडील सुनेला म्हणजे तीर्थरामच्या बायकोला घेऊन तिथे आले. शिक्षण सोडून नोकरी करणे तुला पटत नाही, तेव्हा तुझ्या कुटुंबाचे पोषण आता तूच कर. तिला त्याच्या स्वाधीन करून वडील तत्काळ परतले.

तीर्थरामला वसतिगृह सोडणे भाग पडले. गावात एक जागा भाड्याने घेतली, मिळकत विशेष नव्हती. त्याच्या स्वभावाला अनुकूल अशीच त्याची पत्नी होती. तीर्थराम खर्च भागविण्यासाठी शिकवण्या करी, तीर्थरामनी पत्राने भगतजीना कळविले. मी पत्नीच्या आगमनाने संसार थाटला पण विद्यार्थी दशा सोडण्याचे धाडस मी करू शकत नाही. सन १८९२ साली बी.ए.च्या परीक्षेला बसला. इंग्रजीत चार गुण कमी मिळाल्याने त्याला अपयश आले. पुनः प्रयत्नाला लागला. मधेच संस्कृत भाषा शिकण्याचे केले. त्याला संस्कृत घेऊन परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली. त्यामुळे इंग्रजीकडे जास्त बारकाईने लक्ष देता आले नाही. नापास झाल्याने शिष्यवृत्ती बंद झाली.

### ईश्वरच मदतीला धावला.

या वेळी झंडूमल नावाच्या गृहस्थाने मदत केली. त्यानी तीर्थरामाला आपल्या घरी राहावयास बोलाविले. रामने नकार दिला. रात्रीने एकवेळचे जेवण घेण्याचे केले. काही दिवसानी झंडूमलने आपले राहाते घर त्याला देऊन तो अन्यत्र निघून गेला. काही दिवसांनी तो व तीर्थराम एकाच घरी राहू लागले. झंडूमलने रामवर पित्याहून जास्त प्रेम केले. त्याला कोणतीही अडचण पडू दिली नाही. एकदा देव दर्शनासाठी तीर्थराम पत्नीसह गेला असता घरात चोरी झाली. कपडे भांडी चोरीला गेली. पत्नीला वाईट वाटले. भगवन्त चोराला चोरी करण्याची अनुज्ञा देतो तसे घर भरण्याचेही तोच करतो. झंडूमल याला एक धनवान ज्वालाप्रसाद यानी मदत केली. आठवड्याच्या आत घर पुनःपूर्ववत करून दिले. भगवंत असा मदत करतो.

### अपरिग्रह वृती

फोरमन कॉलेज, लाहोर, येथील प्राध्यापक, गिलबर्डसन यानी तीर्थरामला बोलावून एक पाकीट दिले. त्यात तीस रूपये होते. पैसे वेळेवर मिळाले म्हणून आनंद झाला. पण त्याची नड फक्त दहा रुपयाची होती. तो ते पैसे घेऊन गिलबर्टसनकडे गेला. सर मला इतक्या पैशाची मुळीच जरुरी नाही. परीक्षेसाठी उसने घेतलेले पैसे मला परत करावयासाठी दहा रुपये पुरेत. हे वीस रुपये आपण परत घ्या गिलबर्टसन तयार होईनात. जरूरीपेक्षऽ जास्त पैसे असणे बरे नाही म्हणून हे वीस रुपये आपल्या चरणी अर्पण करीत आहे असे पत्र लिहून धन्नारामकडे पैसे पाठवून दिले. या वरून अपरिग्रह वृत्ती स्पष्ट होते.

### परीक्षा उत्तीर्ण

सन १८९३ साली बी.ए.ची परीक्षा झाली. सबंध पंजाबमधे पहिला क्रमांक लागला. दोन शिष्यवृत्त्या व गणितात पहिला क्रमांक मिळाल्याने रोख रु. ५०/- पारितोषिक मिळाले. नऊ प्रश्न सोडवा असे प्रश्न पत्रिकेत होते यानी सारेच प्रश्न सोडविले. व कोणतेही नऊ तपासाअसे लिहिले याचा परिणाम परीक्षकावर चांगला झाला. त्यांनी सर्वच्या सर्व गुण तीर्थरामला दिले. पदवीदान

प्रसंगी याचा उल्लेख प्राचार्यानी केला व सुवर्णपदक दिले. याप्रमाणे तीर्थराम पदवीधर झाले.

**एक प्रसंग**

तीर्थराम एकदा फिरावयास बाहेर पडले. जलाशय अगर उद्यान इथे ते फिरत असत. ते फिरत असताना अचानक पाऊस आला. एका झाडाखाली अंग चोरून उभे राहिले. सरकारी कॉलेजचे प्राचार्य बेल यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. आपली गाडी थांबवून गाडीत बसण्याची विनंती केली. तीर्थराम गाडीत बसले. त्यानी एम् ए करण्याचा मनोदय बेलना सांगितला. तसेच आपल्या आर्थिक अडचणीबद्दलही कथन केले. बेल यानी तीर्थरामला कॉलेजमधे दाखल करून घेतले. कोणतीही अडचण आली तरी तुम्ही माझ्याकडे या असे सांगितले. अनेक अडचर्णीना तोंड देत तीर्थराम सन १८९५ साली एम.ए. झाले.

एम्. ए. झाल्यावर तीर्थराम नोकरीच्या शोधाला लागले. सरकारी नोकरी मिळाली नाही. शिक्षणक्षेत्रा पुरते नोकरीचे क्षेत्र मर्यादित केले. गणिताचे प्राध्यापक व्हावे ही त्यांची मनीषा. सियालकोट येथे मिशन हायस्कूलमधे शिक्षकाची नोकरी मिळाली, मिळणाऱ्या ऐशी रुपयातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मदत करत असे. अध्यापनानंतर बराच वेळ रिकामा मिळत असे. त्या वेळेचा उपयोग करण्याचे ठरवले. डि.ए.व्ही. कॉलेज प्राध्यापक हंसराज यांच्या विनामूल्य चित्रकलेचे शिक्षण घेण्याची परवानगी मिळविली. परंतु हा विचार सोडून द्यावा लागला.

लाहोर येथे धर्म सभेच्या शिक्षण समितीवर कार्यवाह पदी त्यांची निवड करण्यात आली. या समितितर्फे लाहोर येथे शाळा चालविली जात असे. गणित व विज्ञान हे विषय त्यांच्या वर सोपविण्यात आले. त्यामुळे तीर्थरामाना उसंत मिळेनाशी झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा प्रगत होऊ लागली. त्यांची तब्येत त्यांना साथ देईना. सियालकोट इथली हवा मानवेना.

या सुमारास त्यांची सावत्र आई व सासरे यांचे देहावसान झाले. भगिनी तीर्थादेवीचे देखील थोडक्याच दिवसानी निधन झाले. दुःख हलके होण्यासाठी फावल्या वेळात सनातन धर्माचे मूल्य या विषयावर व्याख्याने देऊ लागले. व्याख्यानाला लोकांची गर्दी होत असे. त्यांची ओघवती वाणी, मनोज्ञ विषय मांडणी आणि जाणकार श्रोते यामुळे त्यांची व्याख्याने रंगत त्यांची कीर्ति सबंध पंजाबभर पसरली. व्याख्यानासाठी त्याना लाहोर, वजीराबाद, जम्मू काश्मीर फेरोजपूर ठिकाणी जावे लागत असे. त्यांनी सियाल कोट येथील नोकरीचा राजीनामा दिला व लाहोरला आले.

लाहोरला फोरमन कॉलेजमधे उपप्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्याच साली गिलबर्ट निवृत्त झाले. तीर्थरामच्या घरची अडचण दूर झाली होती. वाचनाला भरपूर वेळ मिळे. त्यानी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्याना गीतेची मोहिनी पडली. गीता सांगणारा कृष्ण, गोकुळातला गोपीबरोबर प्रेमलीला करणारा कृष्ण, कंसाला मारणारा कृष्ण, हे कृष्णाचे विविध स्वरूप असेल तरी कसे याचे ते चिंतन करू लागले. गीता वाचताना ते ध्यानमग्न होत. कृष्ण भक्तीने त्याना वेडे केले.

**प्राध्यापक तीर्थराम –**

महिन्या भरात त्याना प्राध्यापक म्हणून बढती मिळाली. त्यांचा शिकविण्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर विशेष होई. एक दिवस फळ्यावर एक रेष आढली. न पुसता ही रेष लहान कशी करता येईल असे विद्यार्थ्याना विचारले. कोणाला उत्तर सुचेना. मुले चुपचाप बसली. तेव्हा तीर्थराम म्हणाले मी रेषेच्या खाली लांब रेष काढतो. आता पहा बरे लहान झाली की नाही. मग ते विद्यार्थ्यांना म्हणाले जगात वावराल त्यावेळी दुसऱ्याना मोठे करण्याचा प्रयत्न करा. तुम्ही लहानपण घ्या. धाकुटेपणात भगवंताची सदैव जवळीकता असते. भगवंताशी नाते जुळल्यावर

त्याच्यापेक्षा मोठा माणूस या जगात कोण आहे. या पारमार्थिक सिद्धान्ताची प्रत्येकाने आपल्या प्रपंचात जोपासना करण्यास शिकले पाहिजे. याप्रमाणे आचार व देवत्वाचे सान्निध्य प्रत्येकाच्या अंतःकरणात रुजविण्याचे त्यांचे कार्य चालू होते. त्यांचे वागणे काटेकोर होते.

मोकळा वेळ ते गीतेच्या वाचनात घालवीत. कृष्णाचे आपल्याला दर्शन घडावे अशी त्याना सारखी तळमळ लागून राहिली. ते कृष्णाला अनेक प्रकारे आळवीत व म्हणत मला तू एकदाच दर्शन दे. मी तेवढ्याने तृप्त होईन. गीता वाचताना कृष्ण सतत डोळ्यासमोर उभा राही. सबंध रात्रीचा रात्री चिंतनमय अवस्थेत जात. डोक्याखालची उशी अश्रूनी ओली होत असे. इतर लोक काय म्हणतील इकडे ते लक्ष देत नसत. आवडी निवडी बद्‌ल माऊलीची ओवी अशी आहे. आवडी आणि लाजवी ।व्यसन आणि शिणवी। पिसे आणि न भुलवी। तरी ते कोई।? आवडीची गोष्ट करताना लोक काय म्हणतात या बद्दल लाज वाटता कामा नये. तीर्थरामाची आवड सामान्य लोकापेक्षा वेगळी होती. त्यांची आवड अक्षय सुखासाठी होती. हे व्यसन त्याना सुखमय होते. हे व्यसन नराचा नारायण बनविणारे होते.

एकदा उद्यानात चालताना कोकिळेचा आवाज ऐकिला. त्याना कोकिळा कुठे दिसेना. तिला उदेशूने ते म्हणाले कोकिळे हा मधुर नाद तू कृष्णाच्या मुरलीतून उचललास काय? मला सांग तो सावळा कसा आहे. त्याला तू कुठे पाहिलेस. श्रीकृष्ण श्रीकृष्ण असा टाहो फोडताना शुद्ध हरवली. ते जमीनीवर पडले. त्यांच्या एका शिष्याने त्याना घरी आणले. बराच वेळाने ते भानावर आले. तेव्हा ते म्हणू लागले. मी इथे कसा. मी तर कृष्णाच्या मुरलीच्या नादात धुंद झालो होतो. किती मोहक नाद. कुठे गेला तो नाद? श्रीकृष्णा म्हणून रूद्ध झालेल्या कंठाने हाक मारली.

एकदा संध्याकाळी देवळात गेले. तेथे भागवत पुराण चालू होते. पुराण श्रवण केल्यावर तीर्थरामाचे डोळे भरून आले. श्रीकृष्ण अशी हाक मारली व शुद्ध हारपले. लोकांनी त्याना शुद्धीवर आणले. भानावर आल्यावर ते पुराणिकाना म्हणाले – कृष्णलीलांचा गौरव किती यथार्थ आहे. इतके चांगले वर्णन तुम्ही कसे काय केलेत? तुम्हांला श्रीकृष्णाचे दर्शन झाले का? पुराणिक म्हणाले या जन्मात तरी दर्शन घडेल असे वाटत नाही. त्याचा घोष केल्यावर कधी काळी त्याचे दर्शन घडेल. गोकुळाला गेल्याशिवाय त्याच्या लीला पाहायला मिळणार नाहीत. प्रकृती अस्वास्थामुळे त्याना गोकुळात जावयास जमले नाही. एकदा रात्री चंद्राकडे पाहता पाहता ते मनाने वृंदावनात पोहोचले. कृष्णाची लीला चालू होती. मुरलीचा स्वर आसमंतात भरून राहिला होता. गोपी हातात टिपऱ्या घेऊन कृष्णाभोवती ताल बद्ध नाचत होत्या. त्याना वेळेचे भान नव्हते. त्या दृश्याने तीर्थराम मोहून गेले. कृष्णाला मोठ्याने हाक मारली व भान हरपले. मध्यरात्र उलटून गेली. कृष्णभक्तीचा महापूर ओसंडला. श्रीकृष्णाचे इतके चांगले दर्शन त्याना पूर्वी कधी झाले नव्हते. सकाळची सूर्याची कोवळी किरणे अंगावर पडली तेव्हा ते भानावर आले व घरी परतले.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**

# 'दिशा' सूची- २०११

| क्र. | लेखक | लेखाचे शीर्षक | महिना | व/अंक | पृ. |
|---|---|---|---|---|---|
| १. | | १. सन्मित्रची ६० वर्षांची वाटचाल | एप्रि. | १२/१ | १८-१९ |
| २. | आगरकर, सुधाकर | १. ऑक्सफर्डमधल्या पिट्स रिव्हर संग्रहालयाला भेट | मे. | १२/५ | १८-१९ |
| | | २. ऑक्सफर्डमधील बाल मुलाखतकार | जून | १२/६ | ३-८ |
| | | ३. बर्मिंगहॅमचे इक्कीयानो संग्रहालय | सप्टें. | १२/९ | १८-१९ |
| | | ४. बर्मिंगहॅमच्या थिंग टँकला भेट | ऑग. | १२/८ | ३-६ |
| | | ५. नोबेल पारितोषिक विजेतेशास्त्रज्ञ प्रा. रिचर्ड अर्न्स्ट यांच्याशी दिलखुलास बातचीत | फेब्रु. | १२/२ | १२-१७ |
| | | ६. होहोट: चीनमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक शहर | नोव्हे. | १२/११ | २०-२३ |
| | | ७. होहोट शहरातील समृद्ध वस्तु संग्रहालय | डिसें. | १२/१२ | ६-१० |
| ३. | आठल्ये, श्रीनिवास | १. आनंदाचा गुच्छ | जुलै | १२/७ | १६-१७ |
| | | २. माहिती साक्षरता: आजची गरज उद्याची सोय | ऑग. | १२/८ | ७-१० |
| | | ३. स्व-व्यवस्थापन | सप्टें | १२/९ | ९-१० |
| ४. | उपाध्ये, सचिन | १. मराठी दिवस, मराठी भाषा आणि सावरकर | मे. | १२/५ | ३-७ |
| ५. | कर्णिक, प्रदीप | १. स्मरणयात्रा | एप्रि. | १२/४ | ३-६ |
| ६. | कुलकर्णी, चित्तरंजन | १. एक विरोधाभास - कायदा न्यायपालिकेचा | ऑक्टो. | १२/१० | १७-१८ |
| ७. | गणपुले, सुनीता | १. स्त्री जीवनात विज्ञान पहाट | जाने. | १२/१ | १८-२२ |
| ८. | गराटे, सचिन | १. आधुनिक तंत्रज्ञान आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता | मे. | १२/५ | १५-१७ |
| ९. | गायकवाड, मिताली | १. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या | जुलै. | १२/७ | ३२-३३ |
| १०. | जयकुमार, श्रीविद्या | १. खासदारांची पगारवाढ-कायदा शिल्पकारांसाठी कायदा | जाने. | १२/१ | ३-५ |
| ११. | जोशी, तनुजा | १. 'सन्मित्र' - मनोगत | एप्रि. | १२/४ | २० |
| १२. | जोशी, शरद | १. साहित्य - जगत | मार्च | १२/३ | २०-२२ |
| | | २. साहित्य - जगत | मे. | १२/५ | २०-२२ |
| | | ३. साहित्य - जगत | जून | १२/६ | ९-११ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | टेकाळे नागेश | १. लॅन्डस्केप आणि गार्डनिंग: हिरव्या वाटेवरचा एक अनोखा अभ्यासक्रम | जुलै | १२/७ | ३८ |
| १४. | नाडकर्णी, नरेंद्र | १. इंटिग्रल योगाचे जेष्ठ साधक ऋग्वेद भाष्यकार श्री कपाली शास्त्री (लेखांक ५) | जाने. | १२/१ | ६–९ |
| | | २. ग्रंथालय सेवा: काही विचार, काही, निरीक्षण | ऑक्टो. | १२/१० | १९–२३ |
| | | ३. राणी चुडाला | नोव्हे. | १२/११ | ५–८ |
| | | ४. राष्ट्रभक्तीचा महामंत्र – वंदे मातरम् | सप्टे. | १२/९ | २०–२४ |
| | | ५. सिला मातेरी – मातृशक्ती | डिसें. | १२/१२ | ३–५ |
| १५. | निळकण्ठसुत | १. श्री जगन्नाथाष्टकम | ऑक्टो. | १२/१० | ८–१० |
| १६. | पाटील, मा. ना. | १. अमृतसरच्या सुवर्णमंदिराचे दर्शन–न भूतो न भविष्यती. | ऑग. | १२/८ | २१–२३ |
| | | २. कायम आठवणीत राहिलेली धार्मिक सहल | जुलै | १२/७ | ३–५ |
| | | ३. प्रादेशिक सैन्य अधिकारी व डॉ. वा. ना. बेडेकर | नोव्हे. | १२/११ | ३–४ |
| | | ४. श्री. भाऊसाहेब बांदोडकरांच्या सहवासात गोव्यातील एक दिवस | मार्च | १३/३ | २३–२५ |
| | | ५. श्रीमती इंदिरा गांधींचा खून आणि भरकटलेली धार्मिक सहल | जुलै | १२/७ | ३–५ |
| १७ | पाठक, मोहन | १. अध्ययन अक्षमता आणि पालकत्व | एप्रि. | १२/४ | २८–२९ |
| | | २. ग्रंथसत्ता | जून | १२/६ | २७–२८ |
| | | ३. बायपास सर्जरी: कथा आणि व्यथा | मे. | १२/५ | ३२–३६ |
| | | ४. रे मोरया–एक श्रवणीय व संग्राह्य सीडी | सप्टे. | १२/९ | १६–१७ |
| १८. | बारसे, नारायण | १. ग्रंथालय आधुनिकीकरणाची आव्हाने आणि संधी | डिसें. | १२/१२ | ३६–३९ |
| १९. | भिडे, आशा | १. अमेरिकेत माझी मराठी मंडळात भागवद् गीतेवर प्रवचने | नोव्हे. | १२/११ | १५–१७ |
| | | २. गीता प्रवचनांचे माझे अनेकांगी अनुभव | ऑक्टो. | १२/१० | ३–७ |
| | | ३. गीतारहस्य | मार्च | १२/३ | ७–९ |
| | | ४. पालकनीती | मे | १२/५ | १२–१४ |
| | | ५. प्रेमाचं नातं | जून | १२/६ | १४–१५ |
| २०. | मठ, शं. बा. | १. काम – पुरुषार्थ | मे | १२/५ | २७–३१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २. पसायदान | जाने. | १२/१ | २३-३१ |
| | | ३. भारतीय संस्कृतीचा मूळ पाया (लेखांक - १) | जुलै | १२/७ | १८-२२ |
| | | ४. भारतीय संस्कृतीचा मूळ पाया (लेखांक - २) | ऑग. | १२/८ | १७-२० |
| | | ५. भारतीय संस्कृतीचा मूळ पाया (लेखांक - ३) | सप्टे. | १२/९ | ५-८ |
| | | ६. भारतीय संस्कृतीचा मूळ पाया (लेखांक - ४) | ऑक्टो. | १२/१० | ११-१४ |
| | | ७. भारतीय संस्कृतीचा मूळ पाया (लेखांक - ५) | नोव्हे. | १२/११ | २४-२९ |
| | | ८. रुद्रसूक्तातील रुद्रदेवता | जून | १२/६ | १६-२६ |
| | | ९. वेदकालीन वर्णाश्रम पद्धती | मार्च | १२/३ | २६-३० |
| | | १०. सांख्य तत्त्वज्ञान संक्षिप्त परिचय | डिसें | १२/१२ | ११-१६ |
| | | ११. श्री गणपती अथर्वशीर्ष | फेब्रु. | १२/२ | १८-२५ |
| २१. | माने, यशवंत | १. खरा परमेश्वर | जुलै | १२/७ | २३-२५ |
| | | २. तपस्येचे फळ | नोव्हे. | १२/११ | १८-१९ |
| | | ३. दुसऱ्यांसाठी जगा | मे | १२/५ | ९-११ |
| | | ४. नमस्कार | ऑग. | १२/८ | ११-१३ |
| | | ५. स्वच्छ मन | सप्टें. | १२/९ | १३-१५ |
| २२. | मोरे, दामोदर | १. मराठी कवितेचा प्रवास | जाने. | १२/१ | ३२-३३ |
| | | २. स्पंदने युवा मनाची | मार्च | १२/३ | १०-१९ |
| २३. | राऊत, स्वाती | १. पौराणिक व आधुनिक यज्ञामधील भेद | ऑक्टो. | १२/१० | १६ |
| २४. | राणे, संतोष | १. मराठी कादंबरीचा प्रवास | फेब्रु. | १२/२ | ९-११ |
| २५. | वेडगा, नितीन | १. 'विजय तेंडुलकर' एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व | मार्च | १२/३ | ३-६ |
| २६. | शिंगाडे, चंद्रकांत | १. ग्लोबल वॉर्मिंग आणि भारत | जून | १२/६ | १२-१३ |
| २७. | सांगुर्डेकर, विलास | १. महाराष्ट्र मुद्रण परिषद अध्यक्षीय भाषण | जुलै | १२/७ | ६-८ |
| २८. | साने, यशवंत | १. ८४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे - २०१० | जाने. | १२/१ | १०-१७ |
| | | २. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | फेब्रु | १२/२ | २३-२७ |
| | | ३. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | एप्रि. | १२/४ | २६-३२ |
| | | ४. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | मे | १२/५ | २३-२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ५. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | जून | १२/६ | २९-३८ |
| | | ६. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | जुलै. | १२/७ | २६-३१ |
| | | ७. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | ऑग. | १२/८ | २४-३१ |
| | | ८. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | सप्टें. | १२/९ | २५-३३ |
| | | ९. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | ऑक्टो. | १२/१० | २४-३१ |
| | | १०. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | नोव्हे. | १२/११ | ९-१४ |
| | | ११. भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | डिसें. | १२/१२ | २६-३३ |
| २९. | हाटकर, आकाश | १. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | सप्टें. | १२/९ | ११-११,१५ |

**तक्ता क्र. १ - संपादकीय**

| महिना | वर्ष/अंक | संपादकीय |
|---|---|---|
| जानेवारी | १२/१ | भ्रष्टाचार का? |
| फेब्रुवारी | १२/२ | शिक्षण म्हणजे काय? |
| मार्च | १२/३ | पण लक्षात कोण घेतो? |
| एप्रिल | १२/४ | लढ्यांची शोकांतिका |
| मे | १२/५ | बेशिस्तीला मान्यता... |
| जून | १२/६ | परिस्थिती गंभीर आहे |
| जुलै | १२/७ | जाहिरातबाजी की फसवेगिरी |
| ऑगस्ट | १२/८ | अण्णा हजारेंची चळवळ, गांधीवाद आणि लोकशाही |
| सप्टेंबर | १२/९ | गर्तेत रूतत चालले जग |
| ऑक्टोबर | १२/१० | ग्रंथाच्या इतिहासाचा इतिहास |
| नोव्हेंबर | १२/११ | दरी रूंदावत आहे |
| डिसेंबर | १२/१२ | जगायची पण सक्ती आहे. |

**तक्ता क्र. २ - परिसरवार्ता**

| महिना | वर्ष/अंक | पृष्ठ |
|---|---|---|
| जानेवारी | १२/१ | ३४-३९ |
| फेब्रुवारी | १२/२ | ३३-३९ |
| मार्च | १२/३ | ३१-३८ |
| एप्रिल | १२/४ | ३०-३६ |
| मे | १२/५ | ३८ |
| जून | १२/६ | ३९ |
| जुलै | १२/७ | ३४-३७ |
| ऑगस्ट | १२/८ | ३२-३८ |
| सप्टेंबर | १२/९ | ३४-४० |
| ऑक्टोबर | १२/१० | ३२-३७ |
| नोव्हेंबर | १२/११ | ३०-३६ |
| डिसेंबर | १२/१२ | २४-३५ |

**तक्ता क्र. – ३ पुस्तक परिचय**

| क्र. | मूळ ग्रंथ | लेखक | प्रकाशक | परीक्षणकर्ता | परीक्षणाचे शीर्षक | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आठवणीतले मनमोहन | | उत्कर्ष प्रका. पुणे | शरद जोशी | साहित्य–जगत | डिसें. | १९–२० |
| २ | कस्तुरीगंध(तेजोमय शैक्षणिक वाटचाल) | रा.शि. सावंत | नवजीवन शिक्षण संस्था | मोहन पाठक | कस्तुरीगंध | जुलै | ९–११ |
| ३ | चंदनगंध – बाबासाहेब पुरंदरे गौरव ग्रंथ | अरुण मणेरीकर आणि इतर (संपा.) | श्रीशक्ती शिवराज्या–भिषेक समा. समिती | मोहन पाठक | चंदनगंध | ऑग. | १४–१६ |
| ४ | चिदाकाश–घटाकाश | अरुण ओगले | डॉ.बी.एन. कॉलेज ऑफ अर्किटेक्टर,पुणे | सुरेंद्र लागू | चिदाकाश – घटाकाश रसग्रहणात्मक | जुलै | १२–१५ |
| ५ | मी असा घडलो | भालचंद्र मुणगेकर | लोकवाङ्‌ममगृह, मुंबई | श्रीनिवास आठल्ये | मी असा घडतो : आयुष्याच्या जडणघडणीची पायाभरणी | डिसें. | २१–२५ |
| ६ | रारंगढांग | प्रभाकर पेंढारकर | मौज प्रका. गृह, मुंबई | मोहन पाठक | वेगळ्या विषयाचे अनोखे विश्व | ऑक्टो. | १५ |
| ७ | विवेक चूडामणी | शंकराचार्य | | शं.बा. मठ | ‘श्रीमत् आद्य शंकराचार्यकृत विवेकचूडामणि’ | एप्रिल | ७–१७ |
| ८ | वैष्णवांचा मेळा (संतचरित्रे) | शं.बा. मठ | अरविंद प्रकाशन, ठाणे | मोहन पाठक | वैष्णवांचा मेळा संतचरित्रांचा मर्मग्राही | एप्रिल | २१–२२ |
| ९ | समर्थ गीतमाला | आनंद देवडे | अर्चन प्रकाशन, औरंगाबाद | मोहन पाठक | शाहिर आनंदराव देवडे यांची भक्तीगीते | डिसें. | १७ |

सूचि संकलन

**श्री. सचिन गराटे**

रूपारेल महाविद्यालय, ग्रंथालय विभाग मुंबई

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

### विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र, ठाणे यांचे डॉ. बेडेकर विद्या मंदिरमधील माध्यमिक विभागात नवीन आधुनिक संगणक कक्षाचे उद्‌घाटन

स्वप्न पहा, ते फुलवा आणि सत्यात उतरवा याचा अनुभव आम्हांला नुकताच आला. 'संगणक साक्षरता' हीच आजच्या काळाची गरज. त्याचे महत्त्व जाणून २००८ सालापासून उराशी जपलेलं स्वप्न २०११ च्या डिसेंबर महिन्यात पूर्वत्वास आलं.



**दीपप्रज्वलन करताना डॉ. विजय बेडेकर**



**उद्‌घाटन करताना डॉ. विजय बेडेकर**

डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.वि.) येथे २००२ साला पासून संगणक प्रशिक्षणाचा समावेश विद्यार्थ्यांच्या शालेय अभ्यासक्रमात करण्यात आला. 'शिवराम कॉम्प्युटर्स' या खाजगी संस्थेने शाळेतच उपलब्ध करून दिलेल्या एका छोट्या संगणक कक्षात २० संगणकांसहित मोठ्या आनंदाने ही प्रशिक्षणाची धुरा सांभाळली. प्रत्येक तुकडीस आठवड्यातून दोन तासिका त्यात १ लेखी काम व दुसरी प्रात्यक्षिकासाठी राखून ठेवण्यात आली. एका संगणकावर दोन विद्यार्थी, असे प्रमाणही ठरले. पण संपूर्ण आठवड्यात (प्रात्यक्षिक काम तसे पाहिले तर) विद्यार्थ्यांना फक्त १/२ तास मिळत होता. जो त्यांच्या दृष्टीने फारच कमी होता. पण शालेय प्रशासनात याहून दुसरा वेळ देणेही शक्य नव्हते आणि या विवंचनेतूनच आमचं हे स्वप्न उदयास आलं.




**श्रोत्यांना मार्गदर्शन करताना डॉ. विजय बेडेकर**

२००८ साली विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन माहिती तंत्रज्ञान केंद्र, ठाणे यांनी या संगणक कक्षाचा चार्ज आपल्या हाती घेतला आणि विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वेळ प्रात्यक्षिक करावयास मिळावे यादृष्टीने प्रयत्न सुरू झाले. यावर एकच उपाय निघाला, तो म्हणजे संगणक

कक्षाचे नूतनीकरण! पण तेही इतके सहज साध्य नव्हते. त्यासाठी गरज होती तज्ज्ञ मार्गदर्शकाची – जी उणीव तंत्रनिकेतनचे प्राचार्य व माहिती तंत्रज्ञान केंद्राचे प्रमुख प्रा. श्री. डी. के. नायक यांनी भरून काढली. स्वप्न व कल्पना सत्यात उतरवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांनी अगदी लीलया पेलली आणि सर्वांनाच सुखद धक्का बसला. सोबतच शाळेचे मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ रा. गवई यांनीही नवीन संगणक कक्षाबद्दल दाखवलेले औत्सुक्य ही आम्हांस प्रेरणा देणारे ठरले. या सगळ्यात सर्वांत महत्त्वाची उत्साहवर्धक गोष्ट म्हणजे वि. प्र. मंळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आय. टी. चे महत्त्व जाणून आम्हांस या कक्षासाठी त्वरित दिलेली परवानगी.

जानेवारी २०११ मध्ये कागदावर असलेला संगणक कक्ष डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभागाच्या पहिला मजल्यावर डिसेंबर २०११ मध्ये दिमाखात उभा राहिला.



**संगणक कक्ष**

या भव्य आणि अत्याधुनिक सोयींना युक्त संगणक कक्षाचे उद्घाटन ०३ डिसेंबर रोजी वि.प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते व तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. डी. के. नायक, डॉ. बेडेकर विद्या मंदिर शाळेचे मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ रा. गवई, वि. प्र. मं. चे सभासद श्री. श्री. वि. करंदीकर, श्री. दिलीप जोशी, श्री. अनिरुद्ध जोशी व विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रमुख सौ. श्रीविद्या जयकुमार, जोशी – बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सौ. शकुंतला सिंग, वि.प्र. मं. चे प्रबंधक श्री. रविंद्र रसाळ, अनंत कॉर्पोरेशनचे प्रमुख श्री. कौस्तुभ काळे, वास्तुविद्याविशारद श्री. अविनाश भोळे तसेच शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



**संगणक कक्षात काम करताना**

विद्यार्थ्यांसाठी ३६ व शिक्षकांसाठी २ संगणक, १ एल. सी. डी. प्रोजेक्टस् ४ ए. सी., प्रभावी साऊंड सिस्टम (५ स्पीकर्स व ३ माईक सहित), १ लॅपटॉप (इतर कामांसाठी), तसेच नवीन पद्धतीच्या खुर्च्या घेऊन उभा असलेला पारदर्शक संगणक कक्ष सर्वांचेच लक्ष वेधून घेतो.

आता पूर्वीच्या अध्यापन पद्धती न वापरता लेखी व प्रत्यक्षिक दोन्ही एल.सी.डी. प्रोजेक्टरवर विद्यार्थ्यांना शिकविण्यात येते. तसेच संपूर्ण ७२ विद्यार्थ्यांचा एक वर्ग एकाच वेळी जवळजवळ ४५ मिनिटे प्रात्यक्षिक करू शकतो. अशा आधुनिक संगणक कक्षात मुलांचा वावर नक्कीच वाढलाय. संगणकाच्या तासाला येताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद व गर्व आम्हांला प्रोत्साहित करतो.

त्यासोबतच विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून दरवर्षी एक पुस्तिका देण्यात येते. प्रतिवर्षी संगणक शिक्षकांकडून त्यासंदर्भात वेळोवेळी बदल केले जातात. काळाच्या ओघात या स्तरावर मुले मागे पडू नयेत, म्हणून ॲडव्हान्स सॉफ्टवेअर व ॲप्लीकेशन सुद्धा विद्यार्थ्यांना शिकवले जाते. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त 'संगणक साक्षर' करणे हाच या मागचा उद्देश!




**व्यासपीठावरील मान्यवर**

अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरून घेण्याच्या कामातही गेल्या दोन वर्षांपासून संगणक कक्षात कार्यरत आहे. तसेच एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षणाचे वर्गही विद्यार्थ्यांसाठी भविष्यात विचाराधीन आहेत.

या सर्व जडणघडणीत वेळोवेळी विद्या प्रसारक मंडळ व तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. डी. के. नायक यांचे अमूल्य व आश्वासक मार्गदर्शक आम्हांला मिळाले.

अशा प्रकारे, विद्यार्थ्यांच्या प्रगतिदर्शक वाटचालीत आपणा सर्वांच्या मार्गदर्शनासोबत आमची ही वाटचाल अखंड चालत राहो!

**ज. रा. गवई**
मुख्याध्यापक
डॉ. बेडेकर विद्यामंदिर

## सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विभाग

श्री माँ बाल निकेतन स्कूल तर्फे आयोजित केलेल्या आंतरशालेय ॲथलेटिक्स् स्पर्धेत इ. ७ वी च्या सृष्टी नाईक ह्या आपल्या विद्यार्थीनीने गोळा फेक या स्पर्धेत कांस्य पदक पटकावले.

स्टरफिश स्विमिंग वेलफेअर असो. ने आयोजित केलेल्या १७ व्या जिल्हास्तरीय पोहण्याच्या स्पर्धेत इ. ७वी च्या वैष्णवी देसाई हिने ५० मी. ब्रेस्टस्ट्रोक या स्पर्धेत सुवर्ण पदक व १०० मी या स्पर्धेत कांस्य पदक ब्रेस्टस्ट्रोक पटकावले.

ठाणे जिमखाना आयोजित जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत १२ वर्षाखालील मुले गटात इ. ७ वी च्या गिरीश दिघे ने लॉन टेनिस स्पर्धेत द्वितीय पारितोषिकाची ढाल मिळवली.

नागपूर येथे झालेल्या स्पीड स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया आयेजित ६ व्या खुल्या आमंत्रित राष्ट्रीय रोलर स्केटींग अजिंक्यपद स्पर्धेत दिप बौआ याने २ सुवर्ण व १ रजत पदक पटकावले.

**NSTSE युनिफाईड कॉन्सिल परीक्षा – २०१२ निकाल : १००%**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी – ०८

उत्तीर्ण विद्यार्थी – ०८

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०११ – २०१२ :**

कु. सार्थ निकम ह्या विद्यार्थ्याने बालबोधिनी परीक्षेत मुंबई विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

| इ. | परीक्षाचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्रावीण्य | I श्रेणी | II श्रेणी | III श्रेणी |
| ५ वी | बालबोधिनी | २० | १३ | ०३ | ०२ | ०२ |
| ६ वी | प्राथमिक | ०९ | ०३ | ०४ | – | ०२ |
| ७ वी | प्रवेशिका | १० | – | ०३ | ०४ | ०३ |
| ८ वी | सुबोध | ०२ | – | – | ०१ | ०१ |
| ९ वी | प्रबोध | – | – | – | – | – |

**<u>शशी जोशी स्मृती अभिनय स्पर्धेचा निकाल:</u>**

आमच्या शाळेने सादर केलेल्या 'वादे वादे जायते तत्त्वबोध; या संस्कृत नाट्यप्रवेशास, स्पर्धेत खालील पारितोषिके मिळाली:

१) नाटक – २ रा क्रमांक

२) सौ. प्रियांका भांगले – सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पारितोषिक

३) सौ. अस्मिता मोहिले – सर्वोत्कृष्ट वेषभूषा

४) वैयक्तिक अभिनय पारितोषिक – २ रा क्रमांक – कु. सानिका जोशी

५) वैयक्तिक अभिनय पारितोषिक उत्तेजनार्थ – कु. विभव रानडे

६) प्रेक्षक पसंती पारितोषिक

लेखिका – सौ. सई आठवले
संगीत दिग्दर्शन – सौ. वीणा जोशी

**<u>अमरकोश पाठांतर स्पर्धेचा निकाल :</u>**

इ. ८ वी : प्रणिल जोशी – द्वितीय क्रमांक

**<u>इंदिरा गांधी विज्ञान संशोधन संस्था आयोजित राष्ट्रीय निबंध स्पर्धेचा निकाल :</u>**

इ. ८ वी ची कु. गायत्री पाटील ह्या विद्यार्थीनीला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी तसेच प्रथम पारितोषिक मिळाले.

इ. ७ वी तील कु. अवनी दीक्षित हिला क्रीडा ॲकेडमी आयोजित रिदमिकस जिमनॅस्टिक स्पर्धेत बारा वर्षाखालील वयोगटात दुसरे स्थान पटकावल्यामुळे रौप्य पदक देण्यात आले.

एंजेल शाळेतर्फे सादर करण्यात आलेल्या शपथविधी समारंभात श्री. केशव चौधरी यांनी प्रशस्तिपत्रक वितरित केली.

दीनदयाळ सनस्कृत गायन स्पर्धेत इ. ८ वी तील विद्यार्थी कु. अनिकेत बर्वे ह्याला प्रथम पारितोषिक मिळाले.

## जोशी बेडेकर कला–वाणिज्य महाविद्यालय, ठाणे

### नोव्हेंबर – फेब्रुवारी महिन्यातील वृतान्त

प्राध्यापकांच्या विचारविनिमयाचा मंच असणारी 'व्यास सभा' या कार्यक्रमान्तर्गत 'कोण उत्कृष्ट शिक्षक' या विषयावर साधक–बाधक चर्चा झाली.

व्यास सभा कार्यक्रमान्तर्गत 'Role of ICT in Teaching profession' या विषयी चर्चा झाली. – २३ नोव्हेंबर

२ आणि ९ डिसेंबर सलग दोन आठवडे "Foreign Direct Investment in Retail sector" या विषयी व्यास सभेअन्तर्गत प्राध्यापकांनी उत्तम विचार मांडलेच.

१२ डिसेंबर रोजी संस्कृत विभागातर्फे 'संस्कृत भारती' कोंकण विभागाचे संगठन मंत्री श्री सचिन कठाळे यांचे अतिथीपर भाषण आयेजित करण्यात आले, आणि संस्कृतच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांच्या प्रकल्पांचे

प्रदर्शन ठेवण्यात आले. प्रदर्शनाचे उद्‌घाटन श्री. कठाळे यांच्या हस्ते झाले. श्री. कठाळे यांची ओळख प्रा. सौ. स्वाती राऊत यांनी केली व आभारप्रदर्शन प्रा. सौ. स्वाती भालेराव यांनी केले.

१९ ते २४ डिसेंबर या आठवड्यात councelling cell तर्फे प्राध्यापकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेसाठी नामांकित मानसशास्त्रज्ञांना उद्‌बोधनास आमंत्रित करण्यात आले. श्री. डॉ. अजय सिंग यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. त्यांनी बालपण ते वृद्धत्व या काळात होणारे मानसिक विकास यावर PPT सादर केली. कार्यशाळेस प्रध्यापकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेचे आयोजन प्रा. सौ सुचिता नाईक यांनी केले.

२०,२१,२२ डिसेंबर रोजी महाविद्यालयात ''नवरंग'' उत्सव साजरा करण्यात आला. यात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी T shirt painting, Nail Art, मेहंदी, रंगोळी, वक्तृत्त्व निबंध लेखन, व्यक्तिमत्त्व, नृत्य, गायन, क्रीडा, अशा अनेकविध स्पर्धांत अतिशय उत्साहात सहभाग घेतला. Colour day, साडी Day इत्यादी नवरंगी दिवसही नवरंग उत्सवात साजरे करण्यात आले.

महाविद्यालयातील ''नाट्यमय'' कला अकादमी तर्फे विद्यार्थ्यांनी आन्तर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेवून भरघोस यश संपादित केले. त्याचा वृत्तान्त पुढीलप्रमाणे

'मृगजळ' या एकांकिकेला उत्कृष्ट नाटिकेचे तृतीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले. तसेच 'उत्कृष्ट कलाकार' हे ही पारितोषिक मिळाले.

Ideal Jallosh – 'मराठी सुगमसंगीत ' स्पर्धेत – उत्कुष्ट गायकाचे तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक – मयूर जोशी याला प्रप्त झाले.

स्वलिखित कविता वाचनाचे दुसरे बक्षीस – मानसी जावळे

Duet Dance – द्वितीय पारितोषिक– जिविषा कुळकर्णी व प्रिया टिपले.

– रत्नम महाविद्याल आयोजित

Duet Song – प्रथम पारितोषिक – क्रिस्टल सुलडाणा, अनिशा लोपेज– एस.एम. शेट्टी महाविद्यालय

Extempore speech – प्रथम पारितोषिक – मधुमती बागची – एस.एम. शेट्टी महाविद्यालय

निबन्ध लेखन स्पर्धा – प्रथम पारितोषिक – नेहा कुरुप – एस.एम. शेट्टी महाविद्यालय

Mr. Rang Tarang –प्रथम पारितोषिक – विनित देवाडीया – N.K.T. महाविद्यालय

छायाचित्रण – तृतीय पारितोषिक – पूजा साखरे – सिडनॅहॅम महाविद्यालय

नक्कल – प्रथम पारितोषिक – प्रशांत निगडे– चाणक्य महाविद्यालय

वादन – प्रथम पारितोषिक – योगेश सूर्यवंशी – Ideal Jallosh

Nail Art and Poster Paintings – प्रथम पारितोषिक – अवन्ती रावराणे – चाणक्य महाविद्यालय

सिडनेहॅम महाविद्यालय आयोजित नाट्य स्पर्धेत – 'मुरंजन' या नाटकाला – उत्कृष्ट नाटक, कलाकार (स्त्री व पुरुष), या उत्कुष्ठ दिग्दर्शक, उत्कृष्ट प्रकाश आणि मंच असे 'प्रथम पारितोषिक' मिळाले.

'Best one Act Play' ची Rolling Troph महाविद्यालयास प्राप्त झाली.

आमदार संजय केळकर आयोजित 'कोंकण चषक स्पर्धा' या अन्तर्गत 'अलगद' या एकांकिकेला उत्कृष्ट स्त्री-पुरुष कलाकार, उत्कृष्ट दिग्दर्शन, मंच आणि उत्कृष्ट संगीत व प्रथम पारितोषिके प्राप्त झाले.

**व्यावसायिक कायदा विभाग :**

६ व ७ जानेवारी - व्यावसायिक कायदा या विषयाच्या प्राध्यापिका सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी राम निरंजन झुनझुनवाला महाविद्यालय मुंबई व महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय स्तरांवरील चर्चासत्रात सहभागी झाल्या. 'शैक्षणिक संस्थेत लैगिक शोषण' या विषयावर आयोजित चर्चासत्रात त्यांचा या विषयावरील ''कायद्यापुढील आव्हाने आणि उपाय'' हा शोधनिबंध प्रकाशित झाला.

'व्यावसायिक कायदा' विभागाद्वारे जानेवारी फेब्रुवारी १२ मध्ये द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'कौटुंबिक अत्याचार प्रतिबंधात्मक कायदा'- २००५, वाहन अपघात, २१ व्या शतकातील स्त्रियांची भूमिका, इंटरनेट फायदे- तोटे, सोशल नेटवर्किंग साईटस - फायदे तोटे दहशतवाद - एक समस्या या विविध विषयांवर गटचर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या. या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ शकुंतला सिंह यांचे विशेष योगदान लाभले या प्रत्येक गटचर्चेत उपस्थित राहून त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यासाठी विभाग प्रमुख सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांचे सहकार्य लाभले.

**व्यास सभा :**

प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह महोदयांच्या प्रोत्साहनाने प्राध्यापकांसाठीच आयोजित 'व्याससभा' कार्यक्रमादरम्यान विविध विषयांवर साधक - बाधक चर्चा करण्यात आली चर्चेचे विषय होते -

०६ जानेवारी - Road Accidents a major concern

१३ जानेवारी - Understanding college festivals.

०३ फेब्रुवारी - My favourite Newapaper/ Newschanel

**NSS :**

३ ते ५ जानेवारी - 'रस्ता सुरक्षा सप्ताह' या कार्यक्रमान्तर्गत C. K. T. महाविद्यालयात राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. १७ जानेवारी - लैंगिक शिक्षण' या कार्यक्रमान्तर्गत प्रा. सुचित्रा नाईक यांचे मार्गदर्शनपर भाषणाचे आयोजन करण्यात आले.

२० ते २१ जानेवारी - NSS च्या विद्यार्थ्यांनी 'गंधर्व' कार्यक्रमात सुरक्षा व शिस्तीची संपूर्ण जबाबदारी घेतली. २५ जानेवारी - महाविद्यालयात 'रक्तदान शिबिराला' उत्कृष्ट प्रतिसाद लाभला.

'सख्य' या संस्थेतर्गत Civil Hospital येथे ''स्त्रीभ्रूणहत्या'' या विषयावर पथनाट्याचे सादरीकरण झाले. विद्यार्थ्यांना तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. २७ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. ३० जानेवारी 'सर्वोदय मंडळातर्फे' गांधी पुण्यतिथी निमित्त शांततायात्रेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**गंधर्व महोत्सव -**

१६, २० आणि २१ जानेवारी 'गंधर्व माहेत्सव' साजरा करण्यात आला. तीन दिवसीय या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत ठाणे, पनवेल, अलिबाग, मुंबई तसेच रत्नागिरी इत्यादी विविध विभागातून महाविद्यालयांनी सगभाग घेतला.

२००७ पासून महाविद्यालयात या महोत्सवाची सुरुवात करण्यात आली, पण मागील चारही वर्षाचे विक्रम

मोडीत सहभागी महाविद्यालयानी शंभरी गाठली. पंचवार्षिक कारकीर्द अतिशय उत्साहात पूर्ण केली. एकूण १०७ महाविद्यालये यात सहभागी झाले. सर्वाधिक महाविद्यालयांचा सहभाग असला तरी आपल्या महाविद्यालाने मात्र प्रत्येक स्पर्धेत बक्षिस पटकावून आपल्या नावाचा ठसा उमटवला.

या महोत्सवात सिडबॅहम, रूपारेल, सिद्धार्थ, रुईया, भवन्स, पिल्लई, एम. डी. यांसारख्या नामवंत महाविद्यालयांचा सहभाग होता.

१६ जानेवारीला ठाण्याच्या गडकरी रंगायतन येथे पार पडलेल्या गंधर्वमहोत्सव - १२ या 'नाट्यमय' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संतोष जुवेकर आणि इतर मराठी सिनेकलाकरांचीही उपस्थिती प्रस्तुत स्पर्धेला लाभली होती. महाविद्यालयाने विजेता नाटक व कलाकरांना भरघोस बक्षिसे दिली. पाहिले बक्षिस १०.००० दुसरे ७००० आणि तिसरे ५००० असे बक्षिसांचे स्वरूप होते. त्याचप्रमाणे सर्व विजेत्यांना १००० रुपये रोख, असे बक्षिस देवून गौरवण्यात आले.

लंगडी, लगोरी, तडका या अस्सल गावकडच्या स्पर्धांना देखील स्पर्धकांचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला. त्याचप्रमाणे शरीरसौष्ठव, कवितालेखन, गायन, नृत्य, पथनाट्य इत्यादी स्पर्धांनाही उदंड प्रतिसादात मिळाला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली 'गंधर्वमहोत्सव सोहळा' महोत्सवाच्या Chairperson (अध्यक्ष) उपप्राचार्या सौ. मोनिका देशपांडे, गंधर्व Head अक्षय हेगडे आणि १५० सहकारी यांनी मिळून या महोत्सवाला यशस्वी करण्यात मोलाची कामगिरी बजावली.

**भूगोल विभाग :**

१ फेब्रुवारी - भूगोल विभागातर्फे '' विविध भौगोलिक'' या विषयांवर प्रदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होवून विविध विषयाधारित P.P.T. सादर केल्या शिवाय Field Trip चे सुंदर चित्रण दाखविले. विविध नकाशांचे Bio-Medical waste, सौर उर्जा, जलप्रदूषण, वायुप्रदूषण, मासुदा तलावाचे झालेले दूषितीकरण इत्यादी कित्येक विषयांचे सुंदर प्रदर्शन मांडले होते.

भूगोल विभागाच्या मुख्य प्रा. सौ. अर्चना डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या इतर प्राध्यापकवृंदानी अथक परिश्रम घेतले, विद्यार्थ्यांचा यास भरघोस प्रतिसाद लाभला. प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांचेआणि प्राध्यापकाचे कौतुक करुन उत्तेजन दिले

- वृत्त संकलन
**सौ. स्वाती भालेराव**

## बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

### क्लाउड टेक्नोलॉजी

''क्लाउड टेक्नोलॉजी'' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे दि. ११ व १२ नोव्हेंबर रोजी आयोजित संपन्न झाली. या परिषदेचे उद्घाटन श्री. बी.ए. दमाहे, प्राचार्य एल अॅड टी इनस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी यांच्या हस्ते झाले. या परिषदेला श्री रवी प्रधान, VIA Telecom & Technology /Ex IBM USA, श्री सिद्धार्थ गुप्ता, Microsoft India SMSG DPE Academation, श्री नबाज्योती, solution Specialist & Technology Practice Head, Synergetics Infoemation Technology services India Pvt. Ltd. आदी मान्यवरांनी उपस्थित राहून सर्वांना मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले.

### करियर मेळावा

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १२ वी नंतर कोणते विविध पर्याय उपलब्ध आहेत याची माहिती होण्याच्या दृष्टीने २९ व ३० नोव्हेंबर रोजी करियर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याचे उद्घाटन २५ नोव्हेंबर ला सकाळी ९:३० वाजता प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांशी वैद्यक शास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, रिटेल मॅनेजमेंट, फॅशन डिझायनिंग, नर्सिंग, ज्वेलरी डिझायनिंग, वृत्तपत्रकारिता आदी क्षेत्रातील तज्ज्ञांनी संवाद साधला.

पदवी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता १ व २ डिसेंबर रोजी करियर मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी रिटेल मॅनेजमेंट, ज्वेलरी डिझायनींग, माहिती तंत्रज्ञान शाखा, परदेशी भाषा, व्यवस्थापन अभ्यास, पेट्रोलियम व एनर्जी अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या तज्ज्ञांनी विद्यार्थींना मार्गदर्शन केले व या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या संधीची माहिती करून दिली.

### Looking Back, Looking Forward

दि. ४ डिसेंबर रोजी हरियाली, ठाणे व बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यामाने Looking Forward या विषयावर पाणिनी सभागृहात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

### 'बायोटेक्नोलॉजी इन डायग्नोस्टिक्स'

दिनांक ६ व ७ जानेवारी ला 'बायोटेक्नोलॉजी इन डायग्नोस्टिक्स' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन डॉ. एस.व्ही. चिपळूणकर, प्रमुख संशोधक ॲक्ट्रेक (ACTREC) खारघर यांच्या हस्ते झाले. यावेळी माननीय डॉ.बी.बी. चटटू, संस्थापक कुलगुरू, माता वैष्णोदेवी विद्यापीठ, जम्मू हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. अनु घोष, भाभा अणु संशोधन केंद्र, डॉ. आशेस गांगुली, संचालक, कायोजेन इन्स्टुमेंटस इंडिया प्रा.लि., डॉ रेखा भागवत, प्राध्यापक, डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, नेरूळ, डॉ वंदना सिंग जैवरसायनशास्त्र विभाग, होळकर विज्ञान महाविद्यालय, इंदौर, डॉ. सुप्रिया भालेराव, नायर रूग्णालय, डॉ. भक्ती पाठक, वैज्ञानिक, NIRRH, डॉ. सुरुची जामखेडकर, जेनेटिक कौन्सिलर, डॉ. अजित दातार, सल्लागार, शिमॅडस आदी मान्यवरांशी विद्यार्थ्यांना संवाद साधता आला.

या परिषदेच्या सांगता समारंभाला माननीय डॉ. के.पी. मिश्रा, कुलगुरू, नेहरुग्राम भारती विद्यापीठ, अलाहाबाद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या परिषदेला विविध महाविद्यालयातील १३९ विद्यार्थी व २८ शिक्षक उपस्थित होते.

### शैक्षणिक सहल

प्राणिशास्त्र विभागातर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल, वन्यजीवन अभ्यासासाठी ४ जानेवारी ते १० जानेवारी २०१२ या कालावधीत मढई, मध्य प्रदेश, सातपुडा व्याघ्र प्रकल्प, येथे आयेजित केली होते. प्राणिशास्त्र विषयाच्या १२ विद्यार्थ्यांनी व ३ प्राध्यापकांनी त्यात सहभाग घेतला होता.

### राष्ट्रीय सेवा योजना

महाराष्ट्र राज्य एड्स कंट्रोल सोसायटी व राष्ट्रीय सेवा योजना तर्फे दि. १२ जानेवारी रोजी (युवा दिन) एच.आय.व्ही.एडस् या विषयावर पतंजली सभागृहात कार्य शाळा आयेजित केली होती. श्री. जार्ज रॉड्रीक्स, तज्ज्ञ, महाराष्ट्र राज्य एड्स कंट्रोल सोसायटी, यांनी यावेळी सर्वांना

मार्गदर्शन केले. सुमारे १५० विद्यार्थी व १० शिक्षक या कार्यक्रमात सहभागी होते.

**आकांक्षा**

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन 'आकांक्षा' ची या वर्षातील थीम "West is the Best" ही होती. या वर्षातील आकांक्षा ची सुरुवात ७ डिसेंबर रोजी ''निवेदनाची कार्यशाळा'' या कार्यक्रमाने झाली. सौ. वृंदा कौजलगिकर यांनी चांगले निवेदन कसे करावे याबद्दल उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. आपल्या मनातील भितीवर मात करून व्यासपीठावर कसे बोलावे याबद्दल आपल्याच महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सौ. विंदा मांजरमकर यांनी मुलांना सोप्या शब्दात सांगितले.

विविध स्पर्धा रांगोळी, नववधू मेकअप, मेहेंदी, वेशभूषा, टॅटू मेकींग, फुले सजावट, Vaggi Art, Poster Painting, Wrap the Scrap, कार्टुन ड्राइंग, छायाचित्रकारिता, प्रेमपत्र स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. कु. अनुष्का कुलकर्णी, एफ.वाय. जे. सी. हिला लाईव व्होकल म्युझिकमध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. ग्रुप डान्स मध्ये ५ ग्रुपने सहभाग घेतला होता, ज्यामध्ये सायली चौधरीच्या ग्रुपनी प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान शाखेतील कु. स्वप्नील विचारे याची ''मिस्टर बांदोडकर'' तर बारावीतील कु. मृदुला सावंत हिची ''मिस बांदोडकर'' म्हणून निवड झाली.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात अभ्यासक्रम**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालतर्फे चालवल्या जाणाऱ्या यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात या अभ्यासक्रमाचे २०११-१२ या शैक्षणिक वर्षाचे शिबीर दि. २२-१२-२०११ ते २४-१२-२०११ या दिवशी पार पडले. दररोज सकाळी ९:०० सांयकाळी ६.०० या वेळेत शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २२ डिसेंबर २०११ रोजी सकाळी ०९:०० वाजता या शिबीराचे उद्घाटन शिबीर तज्ज्ञ डॉ. प्रकाश करमरकर, निवृत्त ग्रंथपाल, वझे केळकर महाविद्यालय, मुलुंड व श्री. अजय कांबळे, ग्रंथपाल, अण्णासाहेब वर्तक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वसई यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्रा.एन.एस. बारसे व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विनायक बुरकुले उपस्थित होते.

या शिबीरासाठी बा. ना. बांदोडकर अभ्यासकेंद्राचे एकूण २० विद्यार्थी पूर्णवेळ उपस्थित होते. या शिबीराची साग़ता दि. २४-१२-२०११ रोजी सांय ०४.३० वाजता झाली.

## विधी महाविद्यालय

**मोफत विधी सहाय्य केंद्र –**

विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाने दि. ६ जाने. पासून प्रत्येक शुक्रवारी व शनिवारी ४.३० ते ६.०० या दरम्यान गरीब व गरजू व्यक्तिंसाठी मोफत विधी सल्ला व सहाय्य केंद्राची स्थापना केली. प्रा. विनोद वाघ यांचेकडे सदर केंद्राचा पदभार सोपविण्यात आला.

Future Prctitioners Clubs ची स्थापना–

विद्यार्थ्यांना विधी शाखेच्या कामाची माहिती व्हावी व त्या माध्यमातून त्यांचे ज्ञान वाढावे या हेतूने Future Practioners Club ची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना सदर Club चे सदस्य होण्यासाठी रु. १०/- देऊन नोंदणी करण्याची मुभा देण्यात आली आहे. सदर क्लबचे प्रमुख म्हणून प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. दि. ७ जाने. रोजी प्रा. काझी यांचे "Court fees & suit

valuation" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले तर दि. १४ जाने. रोजी ॲड. राम आपटे यांचे व्हिडिओ व्याख्यान "Drafting of Writs" या विषयावर दाखवण्यात आले. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांचे या विषयावर व्याख्यान झाले. दि. २१ जाने रोजी ॲड. मनोज भट यांचे 'Main tenance application under section 125 of Criminal Procedure code" या विषयावर विशेष व्याख्यान ठेवण्यात आले.

**नानी पालखीवाला मेमोरियल लेक्चर –**

सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश श्री. एस. एच. कपाडिया यांचे दि. १४ जाने. ला "The tail side of Judicial Independance" या विषयावर, टाटा थिअेटर, NCPA, नरिमन पॉईंट, मुंबई येथे व्याख्यान ठेवण्यात आले होते. सदर व्याख्यानासाठी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जय कुमार व काही विद्यार्थी सहभागी झाले.

अे.के.के. न्यू विधी ॲकॅडमी, पुणे व यु.जी.सी. यांच्या विद्यामाने आयोजित केलेल्या दि. २१ जाने २०१२ च्या "Life & personal Liberty -Human Rights Perspective' या विषयावरील चर्चा सत्रात प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी "Redemtion of Articele 21 from IX Schedule black hole" या विषयावर आपला प्रबंध सादर केला.

**भारतीय संविधान दिवस–**

दि. २५ जाने. २०१२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाने ७ वा संविधान दिवस साजरा केला. सदर दिवशी डॉ. सुरेश माने, माजी विभाग प्रमुख, विधी शाखा मुंबई विद्यापीठ, यांनी "Indian Constitution Challenges & Prospects " या विषयावर व्याख्यान दिले. सदर व्याख्यानासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि. २६ जाने. २०१२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे विधी महाविद्यालयाचे द्वितीय वर्ष विधीचे विद्यार्थी श्री. जयेश गोखले यांनी नानी पालखीवाला भाषण स्पर्धेमधे "Need of judiacial Reforms" या विषयावर भाषण देऊन पहिले पारितोषिक रोख रू. ९०००/– व पुस्तक मिळवले.

ठाणे तहसील कार्यालयाने आयोजित केलेया दि. २५ जाने. २०१२ च्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त वादविवाद व निबंध स्पर्धेमध्ये विधी महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळवली.

१) सोपान पलके – द्वितीय वर्ष

२) सुरेश उतेकर – प्रथम वर्ष

३) अलका माने – द्वितीय वर्ष
विनया गवळी

दि. ३१ जाने. २०१२ रोजी व्हि पी.एम. टी.एम्.सी. विधी महाविद्यालयाच्या माध्यमातून डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे ''जादुटोणा कायदा : वस्तुस्थिती आणि वाटचाल'' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानाला प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

•••

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# पुन्हा भ्रष्टाचार

*दिशाचे संपादक मा. डॉ. विजय बेडेकर हे सद्धर्माचे ही संपादक आहेत. त्यांचे सद्धर्मचे संपादकीय वाचकांसाठी देत आहोत.*

आजचे आपले सगळे जीवन 'भ्रष्टाचार मय' झाले आहे. आग लागली तर पाणी मारून आग विझवता येते; पण पाणी आग लावण्याच्या मूळ कारणाचे निर्मूलन करू शकत नाही. भ्रष्टाचार हे एका सडलेल्या समाजाचे 'लक्षण' आहे. लक्षणांचा अभ्यास करून रोगाचे निदान होते आणि हे निदान अचूक झाले तरच योग्य औषध देऊन रोगावर उपाय होऊ शकतो. निसर्गातील इतर घटक, म्हणजे प्राणिमात्र व वनस्पती या तर आजच्या आपल्या भ्रष्टाचाराला निश्चित जबाबदार नाहीत. विज्ञानाने आज हे सिद्ध केले आहे की आजच्या बिघडलेल्या पर्यावरणाच्या संतुलनाला मनुष्यच जबाबदार आहे.

युरोपमधील धर्मक्रांती आणि औद्योगिक क्रांती यांमुळे माणसाच्या जीवनशैलीत बदल झाला. या बदलाकरता जी साधने निर्माण झाली, म्हणजे गाड्यांची निर्मिती, ऊर्जेची निर्मिती, अन्नाची निर्मिती इत्यादी याकरिता निर्माण झालेली साधने जी नैसर्गिक साधनसंपत्तीतूनच निर्माण केली गेली. अशा साधनांच्या निर्मितीचा एक उद्योग झाला. उद्योग आला की त्याची नाळ फायद्याशी बांधली जाते. वस्तूंचा वापर जेवढा जास्त तेवढा, उद्योगांना फायदा जास्त. यांतूनच उपभोक्ता वादाचा (Consumerism) जन्म झाला. आधुनिकता आणि प्रगतीचे मोजमाप हेच मुळी या उपभोक्तावादाच्या आलेखाशी जोडले गेले. सल्फुरिक ॲसिड, साबण, लोखंड इत्यादी इत्यादींचा दर माणशी वापर ज्या देशाचा जास्त, तो देश प्रगत ठरला. विकसित देशाचे बिरुद त्याला मिळाले. वास्तविक नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बेहिशेबी वापरातूनच हे शक्य होत होते. ही साधनसंपत्ती प्राप्त करण्याकरता आपला देश सोडून इतर देशांच्या साधनसंपत्तीचा वापर होऊ लागला. यातूनच वसाहतवाद फोफावत गेला. भौगोलिक वसाहतवाद जरी संपला असला तरी सांस्कृतिक आणि जीवनशैलीचा वसाहतवाद मात्र अंगी पक्का मुरला. या विकसित राष्ट्रांच्या मानवी व्यवहाराची शैली ही देखील आधुनिक व प्रगत असल्याचा आभास निर्माण झाला.

उपभोक्तावादातून निर्माण होणाऱ्या ऐहिक जीवनशैलीशी सुसंगत असेच मानवी व्यवहार नव्या जीवनशैलीचे स्वरूप होऊ लागले. या नवीन जीवनशैलीचा गाभा आत्मकेंद्रितता हा आहे. मी आणि मला हवे ते येनकेन प्रकारे मिळवण्याची लालसा ही त्याच्या पुढची पायरी आहे. यातूनच 'पाश्चात्त्य व्यक्तिस्वातंत्र्याच्या' पुढची पायरी म्हणजे हक्क व अधिकार धर्माच्या तत्त्वज्ञानाची जागा ही राष्ट्राने निर्माण केलेल्या घटनेने घेतली; आणि या घटनेची मूलभूत संकल्पना या तथाकथित स्वातंत्र्य आणि अधिकार यांचा पायाभूत आधार झाली. त्याच्याच रक्षणाकरता कायदे, कायद्यांच्या रक्षणाकरता पोलीस व तत्सम नियामक संस्थांचे जाळे व त्यांतून निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी निर्माण झालेली न्यायव्यवस्था. स्वातंत्र्याचाच एक कंगोरा म्हणून परावलंबित्व हे कमकुवत व मागासलेपणाचे लक्षण ठरले. वास्तविक संपूर्ण मानवी जीवन परस्परावलंबी आहे. मानवी जीवनाचा क्रम हाच मुळी स्थित्यंतरांच्या पायावर आधारलेला आहे. आपण सगळेच आधी लहान असतो, मग गृहस्थ होतो आणि मग ज्येष्ठ होतो. या वेगवेगळ्या स्थित्यंतरांवर उभ्या असलेल्या कुटुंबातील व समाजातील व्यक्तींशी आपण सतत व्यवहार

करतो. यालाच आपण सहजीवन म्हणतो. स्वातंत्र्य आणि जबाबदाऱ्या यांच्या मात्रेची नाळ या सहजीवनाला संतुलित करण्यासाठी हवी असते; पण आत्मकेंद्रितता आणि अधिकारांच्या भ्रामक आणि अवास्तव संकल्पना असे संतुलन उध्वस्त करतात. आजचे उच्चार स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य ही याच आत्मकेंद्रित पायावर उभी असल्याने सर्व नाती आणि परस्परावलंबित्व ही आज नष्ट झाली आहे. यांचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आजची लग्नसंस्था हे आहे.

जबाबदारीशिवाय जे स्वातंत्र्य आणि अधिकार असतात. त्यालाच स्वैराचार म्हणतात. आजचे वकिली तर्क, युक्तिवाद हे आपल्याच घटनेचा आधार घेऊन कळतनकळत या स्वैराचाराचे समर्थन आणि पोषण करतात. मनुष्य सगळ्या जगाला फसवू शकतो; पण स्वत:ला कधी फसवू शकत नाही, ही जाणीव ज्या व्यक्तीत असते तीच खरी सुसंस्कृत व्यक्ती असते. आणि अशा व्यक्तिला आपल्या चुकांची कबुली देणे यात पराभवाची भावना नसते. उलट त्यांत कर्तव्यपूर्तीचे समाधान असते घटना, कायदा, न्यायालये अशा जाणीवाचा मनुष्य तयार करू शकत नाहित. अशा जाणीवेचे बधिरत्व आलेल्या समाजातील न्यायव्यवस्थाच काय तर सगळ्याच संस्था बधिर असतात.

आजचा भ्रष्टाचार हा नीती व मूल्यहीन, आत्मकेंद्रित जीवनशैली जगणाऱ्या सडलेल्या समाजांचे लक्षण आहे. त्याच्या निर्मूलनाची साधने घटनेत, नवीन कायद्यात किंवा लोकपालच्या निर्मितीत शोधणे, हा मोठा विनोदाचा भाग आहे. २५% गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सभासदांनी भरलेल्या संविधानाचे पावित्र्य आणि स्वातंत्र्याचा आग्रह हा ही तितकाच हास्यास्पद आहे.

आजची खरी गरज आहे ती नीतिवान, चारित्र्यशील माणसाच्या निर्मितीची. आपली धर्मसंस्था आपण उध्वस्त केली आहे. स्वातंत्र्य आणि अधिकाराच्या नावाखाली कौटुंबिक आणि सामाजिक संस्थाही नष्ट केल्या आहेत. बहुसंख्य सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय नेतृत्व हे ठेंगू आहे. यांतून मार्ग एकच आहे, तो म्हणजे आपल्याच संस्कृतीतील आणि धर्मातील शाश्वत मूल्यांचा आधार घेणे.

•••

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा, एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा. माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी, माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये, एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

# पसायदान



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।

दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।

आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

## ❈ सार्थ पसायदान ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**संपर्क**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.